# प्रकरण तिसरे

## - ज्ञानेश्वर व्यक्तित्व -

ज्ञानेश्वर माऊली व त्यांची ग्रंथसंपदा

ज्ञानेशांचे प्रयोजन व भूमिका

ज्ञानेश्वरांवरील पूर्वसंस्कार

ज्ञानेशांचे दुहेरी व्यक्तित्व

तत्वदर्शी ज्ञानेश्वर

कवी ज्ञानेश्वर

ज्ञानेशांचा समन्वयवाद

ज्ञानेश्वर व इतर कवींमधील फरक

ज्ञानेशांच्या निसर्गाचे भिन्नत्व

त्यांची चौफेर दृष्टी


समारोप व निष्कर्ष

# ॥ ज्ञानेश्वरी ॥

# ॥ अमृतानुभव ॥

# ॥ चांगदेव पासष्टी ॥

# ॥ अभंगवाणी ॥



"या चतुरालंकाराचा ठेवा।
घडविला ज्ञानदेवा।
विश्वरूपाचा धावा।
पसायदानी॥"

## ज्ञानेश्वर - व्यक्तित्व

"निसर्ग व प्रतिमांचा" स्वतंत्र अभ्यास केल्यानंतर ज्यांच्या निसर्ग-प्रतिमांचा आपण अभ्यास करावयाचा आहे. त्या ज्ञानेश्वर माउलीच्या व्यक्तित्वाकडे व कार्यकर्तृत्वाकडे एकवार नजर टाकणे अत्योचित ठरते.

## ज्ञानेश्वर माउली

विशाल अनादि अनंत काळाच्या मांडीवर खेळणारे एखादे शतक इतके भाग्यवान असते की त्याला एका महात्म्याचे पवित्र स्वप्न पडते व ते साकारही होते. बाराव्या शतकानेही अशाच एका महात्म्याचे स्वप्न पाहिले नि ते प्रत्यक्षात अवतरले. ज्ञानियाचा राजा ज्ञानेश्वरांच्या रुपाने मूर्तीमंत वैराग्यमूर्ती असणा-या विठ्ठलपंताच्या उदरी हा विरक्तीचा वतनदार जन्मला. ज्ञानाचा वारसदार अवतरला ! जे मूर्तिमंत ज्ञान होते. गीतेच्या तत्वज्ञानाच्या गहन वनातील मोजकीच मोहक फुले ज्यांनी सामान्यांसाठी वेचून आणली. तत्वज्ञान कितीही क्लिष्ट असा ज्ञानेशांच्या वाणीचा स्पर्श होताच ते सुगम्य झालेच म्हणून समजावे. कोणताहि योग असो ज्ञानेशांच्या वाणीच्या प्रओघात सुकर होऊन वाहवला असे मानावे. साक्षात अनुभुती व ग्रांथिक ज्ञानाची साथ यातून साकारलेले त्यांचे ग्रंथ कर्तृत्व "अक्षर" ठरावे यात नवल नाही. म्हणूनच अवघे थोडया वर्षांचे हे पोर "ज्ञानियांचा राजा" होऊन बसले.

आपल्या "वत्सल स्वभावाने सा-या महाराष्ट्राची माउली होऊन बसले. "माउली" या शब्दातच केवढा जिव्हाळा, आपुलकी नि कोवळिक भरलेली आहे की बस्स ! या माउलीच्या हृदयातुन "ज्ञानेश्वरी"सम अमृत ग्रंथ स्रवला. गीता हे गाईचे दूध होते नि कुपोषित समाजाला गरज होती गाईपेक्षा "आईच्या" दुधाची ! ज्ञानश्वर माउलीने या पामरांना आकंठ दुग्धपान घडवले. मराठी मनाने याच दुधाच्या सकसतेमुळे जोमदार बाळसे धरले. याच माउलीने गीता-

ज्ञानाचे सुमधुर क्षीरपान घडवून "हल्लरु" गाऊन सुखनिद्रा हरवलेल्या समाजाला "समाधी-बोधात" निजवले.

अवतरणे, खंडनमंडन, अभिनिवेश यातून तत्वज्ञान डोक्यात शिरते पण हृदयात उतरत नाही. तत्वज्ञानासारखा विषयही कसा सुमधुर व जीवनस्पर्शी बनु शकतो हे माऊलींनी वेदांताच्या क्लिष्ट परिभाषेस सहजतया फाटा देऊन दाखवले. किंबहुना आपल्या तेजोत्सर्जी शब्दांनी महाराष्ट्राच्या हृदयातील अज्ञान तिमिराचा नाश केला. गीतेवर हिंदी, संस्कृत, मराठी, इंग्रजी भाषेत ब-याच टिका लिहल्या गेल्या. पण त्यापैकी रानडयांचे "तुलनात्मक अध्ययन" पूर्ण भाष्य व ज्ञानेशांचे भावार्थपूर्ण भाष्य श्रेष्ठ ठरले. पण या दोहोतही श्रेष्ठ ठरली या वारक-याने लिहिलेली "भावार्थ दिपिका". कारण यात समाज मनाची स्पंदने ज्ञानेशांनी अचूक हेरली होती. अशिक्षित समाजाची नेमकी नस तपासून त्यावर योग्य उपचार केला होता.

लहान वयात अनेकविध व्याधींमुळे मन मरगळलेले असतानाही निकोप धर्मभावना, निर्मळ कवित्व व निरोगी मन तयार करण्याची लोक विलक्षण अन् तितकीच लोकोत्तर किमया या कोवळ्या पोराच्या कोमल प्रतिभेने करुन दाखविली. हाच मोठा चमत्कार मानला पाहिजे. ज्ञानेश केवळ संतश्रेष्ठच नव्हते तर महाराष्ट्रातील गीतेवरील एक श्रेष्ठ भाष्यकारही होते. तत्वज्ञान, काव्य, आत्मानुभुतीचा त्रिवेणी संगम ज्या व्यक्तित्वात एकवटला असे ते एक अभुतपूर्व व्यक्तिमत्वच होते. हे निश्चित !

## ज्ञानेशांची ग्रंथसंपदा -

सूर्याचे कार्य असते प्रकाश देणे, भूमीचे कार्य असते अन्नधान्य पिकवणे तसे संताचे कार्य असते समाजाला सद्गतीच्या वाटेवर नेणे. संसाराच्या जोखडात अडकलेल्या "प्रापंचिकाना" "सो हं" भावात सुस्नान करुन मुक्तीच्या राणीवेवर

बसवणे हे ज्ञानेशांचे जिवितकार्य होते. ते एक द्रष्टे संत होते. आपली कार्यपरंपरा आपल्यापुरतीच मर्यादित न राहता ती पुढे अखंड चालू रहावी याच हेतूने त्यांनी वारकरी संप्रदाय स्थापन केला.

"पंढरीचा वास चंद्रभागे स्नान । आणिक दर्शन विठोबाचे ।
हेचि घडो मज जन्मजन्मांतरी । मागणे श्रीहरी नाही दुजे ।।"

हीच सद्भावपूर्ण शिकवण त्यांनी "अक्षर" शब्दात गुंफुन ठेवली होती. प्रत्येकापुढे त्यांनी वेगवेगळ्या वाटा उलगडून ठेवल्या नि ज्याने त्याने हवी ती वाट निवडून मुक्तीकडे वाटचाल करावी यासाठी त्यांनी लेखणी झिजवली.

ज्ञानेश्वरी - हे त्यांच्या वाङ्‌मयवेलीवरचे पहिले पुष्प । ज्ञानेशांच्या अंतरंगाचा अपूर्व विलास यात पहायला मिळतो म्हणूनच तिला ज्ञानेशांची वाङ्‌मयमूर्ती म्हणतात. साक्षात शांतीब्रम्हाचे रुप असलेल्या ज्ञानेशांनी इथे शांतरसाचा गौरव केला आहे. किंबहुना शांतरसानेच आपला गौरव खुद्द ज्ञानेशांकडून करुन घेतला आहे. कर्मयोग, ज्ञान, ध्यान, भक्ती यांचे सुस्पष्ट विवेचन करीत या सर्व वाटा ज्या शांती कैलासाकडे जातात त्याचे रुपडेही ज्ञानेशांनी समर्थ शब्दात चित्रीत केले आहे. सर्व योगांपेक्षा त्यांनी साध्या व सामान्यांना सुलभ अशा भक्तिमार्गास अधिक प्राधान्य दिले आहे.

तत्वज्ञान व काव्य, भक्तियोग व कर्मयोग, भक्तिमार्ग व योगमार्ग या सा-यांचा नितांत सुंदर समन्वय ज्ञानेशांनी यात साधलेला दिसतो. ते समन्वयवादी होते, योगी, तत्वज्ञ व कवीही होते. या नउहजारांहून अधिक असलेल्या रसाळ ओव्यांमध्ये भक्ती आहे, कर्म आहे, योग आहे, साहित्य व शांतरसाचा भोग आहे. मराठीचा गौरव आहे. परमेश्वराशी संधान बांधण्याचा उपदेश आहे. म्हणूनच "नामा म्हणे ग्रंथ । श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी । अनुभवावी ।।" या नामदेवाच्या अभिप्रायात आपणही निःशंक मनाने सहमत होतो. कुमुदिनी घारपुरे म्हणतात, "ज्याप्रमाणे कर्पूरात शुभ्रता, मृदूता व सुगंध असतो त्याप्रमाणे ज्ञानेश्वरीत विद्वत्व, साधुत्व व कवित्वाचा त्रिवेणी संगम साधलेला आहे".

अमृतानुभव - ज्ञानेशांच्या परिपक्वप्रज्ञ व स्वतंत्र तत्वज्ञानाचा अविष्कार म्हणजे अमृतानुभव हा ग्रंथ होय. ज्ञानेश्वरी अध्यात्मिक दृष्टिने तज्ञ व अज्ञ या सा-यांसाठीच होती. तिथे भाषेचा गौरव होता, काव्याचा गौरव होता तसा तत्वज्ञानाचाही होता. "भाष्यकाराते वाट पुसतु" ही भुमिका तेथे होती. म्हणूनच स्वतंत्र तत्वदर्शी प्रतिभेने त्यांनी ज्ञानसूर्याचे पूजन केले त्याचे नाव "अमृतानुभव". यात ते स्वयंप्रकाशाचे वर्णन करीत आहेत. स्वत:च स्वत:चे वर्णन कसे करावे म्हणून ते "बोल निमे ते बोलणे येथीचे "अशा अवस्थेचे वर्णन मौनाच्या गाभ्यात शिरुन करावे लागते असे करतात. येथे मुक्तबध्द व मुमुक्षु या सा-या सीमारेषा सरून ठरतो तो केवळ कैवल्याचा सोहळा व या कैवल्य सोहळ्याचा अनुभव म्हणजेच हा ग्रंथ. वि.ल. भावे याला "तत्वज्ञानाचे शुध्द रसायन" म्हणतात. नमनापासून ज्ञानाज्ञान खंडन करुन जीवन्मुक्त दशेच्या वर्णनापर्यंत ज्ञानेश्वर अत्यंत सहजपणे पोहोचलेले दिसतात. श्रेष्ठ दर्जाचे तत्वज्ञान दृष्टांताच्या मदतीने कसे मांडावे याचा आदर्श म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते. "जग आसकी वस्तुप्रभा" हा पूर्णाद्वैताचा सिध्दांत यात मांडला आहे. चिद्विलासवादा सारखा महत्वाचा सिध्दांत यात मांडला. या ग्रंथात दृष्टांताची बहार आहे, तत्वज्ञानाची उंची आहे, आत्मानुभवाची सीमा आहे आणि क्वचित कोठे काव्यही आहे [तुळपुळे - पाच संतकवी ].

चांगदेव पासष्टी - चुळकाभर अमृताची चव व सागरभर अमृताची चव सारखीच असते. त्याप्रमाणे ज्ञानेश्वरीरुपी सागरातले शब्दांचे संजिवन सामर्थ्य व चांगदेव पासष्टीतील ओव्यांचे सामर्थ्य सारखेच आहे. "चांगदेव पासष्टी" प्रासंगिक आहे. चांगदेवांचे कोरेच पत्र आलेले पाहून ज्ञानेशांनी त्यांना या पासष्ट ओव्यांच्या रुपाने उत्तर पाठवले. यात त्यांनी आत्मसाक्षात्काराचे व आत्मबोधाचे विवचन केले आहे. या पासष्ट ओव्यांच्या आरशात आपले प्रतिबिंब पाहताच तुम्हाला आत्मा व परमात्मा यातला अभेद जाणवेल असे ज्ञानेश सांगतात. आत्मानात्म विचारांपासून अद्वैत बोधापर्यंतचा हा सहजप्रवास

म्हणजे ज्ञानेशांच्या शब्दसामर्थ्याचे, विचारवैभवाचे व अमृतानुभवाचे एक कैवल्य लेणेच आहे.

"सोने सोनपणा उणे । न होताचि झाले लेणे । ते वि न वेचता जग होणे ।
अंगे जया ।।"

अशा आत्मानात्म विचारापासून दृष्टांताच्या सहाय्याने द्वैत सोडीत, स्फूर्तिवाद पुकारीत ज्ञानदेव अद्वैत सिध्दांत स्थापनेपर्यंत गेले आहेत. एका हठयोग्याला ज्ञानयोग्याने लिहलेले हे एक अध्यात्मपर पत्र आहे.

अभंगवाणी - यात ज्ञानेश्वरांतील कवीचे अपूर्व दर्शन घडते ही अभंगवाणी सामान्यजनांसाठी, किर्तन प्रवचनासाठी जन्मली. यात एक अपूर्व संत भेटतो.... नामभक्तीत रंगलेला, भक्तमेळ्यात हरवलेला, किर्तनी दंगलेला, जातिभेदातीत भक्ती व बहुविधत्वातील एकतेचा अनुभव यात येतो. मात्र यात अलौकिकालाही लौकिकाच्या पातळीवर आणले जाते. त्यांच्या गौळणी व विरहिणी म्हणजे भावगीतांचे एकेक उत्कट नमुने आहेत. टिपरी, हमामा, फुगडी, जोहार, पाळणा या प्रकारच्या रचनाही पाहण्याजोग्या आहेत. या सर्वांत भक्तीचा एकच एक धागा अनुस्युत असलेला दिसतो. तरीही एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की इतर संतांप्रमाणे पतित व्यक्तिमत्त्वाची, यातिहीनतेची, प्रापंचिक तापाची जाणीव ज्ञानदेवांच्या अभंगात कुठेच जाणवत नाही. त्यात व्यक्तिगत जीवनाचा स्पर्श कुठेच दिसत नाही.

ज्ञानदेवांची ही लेखनसंपदा, हे चार ग्रंथ म्हणजे भाविकांचे चारीधाम किंवा चतुर्विध मोक्षच आहेत. ज्ञानेशांची ग्रंथसंपदा पाहिल्यानंतर एका गोष्टीचा विशेष उलगडा वाचकांना होतो तो म्हणजे या लेखनामागे असलेले ज्ञानेशांचे प्रयोजन व वैयक्तिक सुखदु:खापासून असलेले ग्रंथाचे अलिप्तपण. ज्ञानेशांचे प्रयोजन कवित्व प्रदर्शनाचे होते की अध्यात्म्य विवेचनाचे होते ? समाजसुधारण्याचे होते की तत्त्वज्ञानविवरणाचे होते हे ही पाहणे आवश्यक ठरते. प्रस्तुत निबंधात आपणास प्रामुख्याने ज्ञानेश्वरीचाच विचार करावयाचा असल्याने ज्ञानेश्वरीमागील त्यांचे प्रयोजन व भुमिका यांचाच येथे विचार करू.

## ज्ञानेशांचे प्रयोजन व भूमिका -

"प्रयोजनेविण वातो पि न प्रवर्तते" असे म्हणतात. ना. कोणत्याहि लेखनामागे कोणती ना कोणती प्रेरणा प्रकट वा गुप्त रूपात उभी असतेच. अर्थात याबद्दल समिक्षकात बरेच वाद आहेत. "गाण्याने श्रम वाटतात हलके. हेही नसे थोडके" असे केशवसुत म्हणतात. ते काही खोटे नाही. पण ज्ञानेशांसारखा एखादा युगपुरुष जेव्हा साहित्यनिर्मिती करतो तेव्हा केवळ व्यक्तिनिष्ठ आनंदापुरतीच ती निर्मिती आहे असे म्हणणे अयोग्य ठरेल. त्यांच्या काव्यातला हा आनंद तर स्थलकालाच्या सीमारेषा ओलांडून गेलेला दिसतो. अशा निर्मिती मागचे प्रयोजन, सहेतुकत्व त्या त्या काळाच्या पार्श्वभूमीवरच शोधावे लागते.

ज्ञानेश्वरांचा कालखंड म्हणजे महाराष्ट्राचे ऐश्वर्यसंपन्न पर्व, यादव राजवटीची भरभराट व -हास याच कालखंडाने पाहिली. जैन, लिंगायत, महानुभवादी पंथ याच काळात उदयास आले. नाथ, वारकरी पंथही यावेळी कार्यरत होते. मात्र सामान्य लोक वेगळ्याच गोष्टीत मग्न होते. भरमसाठ देवता, भूतखेताची अंधश्रध्दा, व्रतवैकल्यादी दुष्ट चक्रात हे सापडले होते. ख-या धर्माचा लोप होऊन भोंदू लोक लोकांची दिशाभूल करीत होते. महानुभावियांनी मराठी भाषेला मात्र सुस्थिती आणली होती. कर्मकांडाच्या प्रस्थामुळे वैदिक परंपरा विशिष्ट वर्गाची मिरासदारी झाली होती याची झळ प्रत्यक्ष ज्ञानदेवांनाही बसली होती. जातिभेदाचे रोपटे फोफावले होते.

या पार्श्वभूमीवर ज्ञानेशांनी आपली लेखणी उचलली. जीवनाचे सुख केवळ पैशात नसते व सुखी जीवनाचा मंत्र फक्त आर्थिक समता नाही तर चिरंतन ललितरम्य सुखासाठी मानवी जीवनाला आणखी अनेक गोष्टींची आवश्यकता असते. म्हणनच ज्ञानेशांना मन विशाल, स्थिर, शांत, सरळ व सोज्वळ करणारी धार्मिक प्रेरणा मोलाची वाटली. नाना जातीजमातींना भक्तीमार्गाच्या वाटा खुल्या करायच्या होत्या. युगानुयुगे परमेश्वराची द्वारे ज्या लोकांना बंद

होती. त्यांच्यासाठी त्यांना ती खुली करुन दयायची होती. "मां हि पार्थ व्यपाश्रित्य ये पि स्यु: पापयोनय: । स्त्रियोवेश्यास्तथा शूप्तोस्तेजी यांति परांगतिम् ।। " या सम ज्ञानेशांची दृष्टी उदात्त होती [गीता अ. ९-३२]

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्ञानेशांना भक्तीचा साधा, सोपा व सरळ मार्ग सर्वसामान्य लोकांसाठी सांगावयाचा होता. स्वर्गसुखाच्या मोहात न पडता मनाने भगवंताशी रत व्हावे व स्वकर्मे सुखाने करावी हा बोध त्यांना करावयाचा होता. एवढेच नव्हे तर "मराठिचिये नगरी । ब्रह्मविदयेचा सुकाळु" करुन त्यांना ब्रम्हविदयेची देवाणघेवाण सुखाचि करायची होती. कृपण वेदांचा व उपनिषदांचा गाभा गीतेत आहे. गाभा महत्वाचा पण तो लोकभाषेत यावा, लोकांच्या कानावर जावा ही ज्ञानेशांची प्रामाणिक इच्छा होती. "तैसा मनाचा मारा" न करता "इंद्रिया दु:ख न देता । रथ मोक्ष असे आयता । श्रवणा माजी ।।" हा श्रवण सुलभ मोक्ष या लोकांना मिळावा ही त्यांची इच्छा होती.

श्रीप्रभूची वाङ्मयमूर्ती शब्दात रेखाटावी ही त्यांची मनस्वी इच्छा होती. कारागीर व व्यापारी वर्गातील झगडा व असंतुष्टता संताच्या आर्त वाणीतून बाहेर पडत होती. उत्तरेकडून येणारी इस्लामी आक्रमण ध्यानात घेऊन ज्ञानेश्वरीची निर्मिती झाली.[१] असेही मत मांडले गेले. इस्लामांच्या अत्याचाराला देवधर्माची भक्ती हेच एकमेव उत्तर होते व हे ज्ञानेशांना जनतेच्या हृदयात ठसवायचे होते. डॉ. वि. भि. कोलते म्हणतात, "चक्रधरांच्या द्वैताच्या पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वरीची निर्मिती झाली.[२] एकंदरीत यातून असा निष्कर्ष काढता येईल की ज्ञानेशांना स्थलकाल निरपेक्ष टिकून राहिल असा ज्ञानयुक्त व कर्मयुक्त भक्तीमार्ग लोकांना दाखवायचा होता. हेच त्याचे

---

१. न. र. फाटक - "ज्ञानेश्वर वाङ्मय आणि कार्य" - पान २२ - २३

२. वि. भि. कोलते - "प्राचीन मराठी साहित्य संशोधन" - १९६८
पान ६४ - ६५.

मुख्य प्रयोजन असावे. अर्थात ज्ञानेश्वरी लेखनामागचे साहित्यिक प्रयोजन देखिल विसरता येणार नाही. त्यांना "बोली अरूपाचे रुप दाविन I अतिंद्रियपरी भोगविन I इंद्रियाकरवी II" हे साधावयाचे होते. सामान्य लोकांची जिज्ञासू भाविकांची मने भारावून टाकून त्या अवस्थेतच त्यांच्यावर ज्ञानाचे संस्कार करण्याचा उद्देश मनात ठेवूनच त्यांनी अलौकिक काव्य-सौंदर्याची बहार करून सोडली. विश्वात्मक देवाच्या प्रसादाने नवनवोन्मेष शालीनी प्रतिभेचा प्रकर्ष साधला. त्यांना श्रवणसुखाच्या शीतल मंडपात वसंताच्या समृध्द शोभेची अनुभूती आणून दयायची होती. म्हणूनच त्यांनी भाषेच्या प्रभावी उपयोगाच्या बाबतीत व ज्ञानाच्या विषयाचे परिणामकारक विवेचन करण्याच्या बाबतीत काव्याच्या मोहक सृष्टीच्या सामर्थ्याचा कौशल्याने वापर केला. "म्हणोनि माझे नित्य नवे I श्वासोच्छवासही प्रबंध होआवे II" [ज्ञा. १८- १७३४] असा आत्मविश्वास प्रकट केला. अलौकिक कवित्वाच्या सहाय्याने कलेची अपर सृष्टी निर्माण करून विश्वामित्रावर किंवा प्रत्यक्ष प्रजापतीवर ताण करणा-या या महाकवीला मराठी वाग्यज्ञात ही पूर्णाहुती दयावयाची होती. मंत्रतंत्र, उपासना, व्रत, नियम यांच्या मागे लागलेल्या लक्षावधी भाविकांना तृप्तीचा संतोष दयावयाचा होता. जीवनातील सर्व स्पृहणीय गोष्टींची परिसीमा जेथे होते तो परमेश्वर आपली माऊली आहे ही भावना सर्वांच्या हृदयात रूजवावयाची होती. जन्माचे साफल्य करणारा हा ग्रंथसिध्दीचा सोहळा श्रोत्यांनी अनुभवावा व त्यांच्या "भाग्याची उजरी" व्हावी ही त्यांची अपेक्षा होती. "पिकल्या सुखाच्या परिमळाने त्यांना" जग धुंद करून टाकायचे होते. जगाला सुखाची दिवाळी प्राप्त करून दयायची होती यासाठी त्यांनी हा लेखनप्रपंच केला.

सर्व विश्व सुखी व्हावे या हेतूने श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी लिहली व लोकांची प्रवृत्ती ती वाचण्याकडे व्हावी एवढया करता त्यांनी ती अलंकार व काव्यगुणांनी सजवली. तेव्हा तिच्या केवळ काव्यानंदातच रमून न जाता अंतरंगात शिरून आत्मविदयारुपी ज्ञानगंगेत लोकांना अवगाहन करता यावे

व्रतद्वारा त्यांना मोक्षसुखाचा लाभ व्हावा हा हेतु होता. स्वतःला संस्कृत भाषा उत्तम अवगत असताही त्यांनी आपली गीताटीका आबाल सुबोध अशा "मराठी"त लिहली याचे पहिले कारण व्रतवैकल्याच्या मागे लागलेला बहुजन समाज "गीर्वाण" भाषेस पारखा झालेला होता. वैदिक तत्वज्ञान बहुजन समाजाच्या गळी उतरवण्याकरता ज्ञानेशांची आपली ग्रंथरचना मराठी भाषेत केली. दुसरे कारण म्हणजे ज्ञानेशाचे मराठी भाषेवरील उत्कट प्रेम श्रीज्ञानेशांनी संस्कृत भाषासृष्टीस तोडीस तोड अशी दुसरी मराठी भाषासृष्टी "ज्ञानेश्वरी" या ग्रंथरुपाने निर्माण केली. त्यांनी तत्वज्ञानाला प्रेमाची माधुरी दिली. ज्ञानेश्वरी मागची ही सर्व प्रयोजने लक्षात घेतली की त्यांची भुमिका आपोआपच सुस्पष्ट होत जाते. त्यांची भुमिका कवीची होती, तत्वज्ञाची होती, योग्याची होती की भक्ताची होती हे आपण पुढे पाहणारच आहोत. तत्पूर्वी आपणी एका महत्वाच्या गोष्टीचा विचार करणे अपरिहार्य ठरते ती म्हणजे ज्ञानेशांवरील पूर्वसूरींचे संस्कार, सारांश ज्ञानेश्वरीच्या अर्थाचे सुलभ विशदीकरण, सार्थ आकलन, निःसंदिग्ध विवेचन, ज्ञानानंद व वेदध्यानानंद देणे, मनमोहक शब्दावलीची गुंफण या प्रमुख हेतूंनी ज्ञानेश्वरी लिहली गेली.

## <u>ज्ञानेश्वरांवरील पूर्वसंस्कार</u> -

ज्ञानेश्वर स्वतःच सांगतात की आपण करीत असलेली विवेचन भाष्यकाराने वाट पुसतु" असे केले आहे. जाणत्या समिक्षकाच्या नजरेतून पाहिल्यास ज्ञानेशांवरचे पूर्वसंस्कार आपणास प्रकर्षाने जाणवतात. त्यांनी जातीकुल विषयक अनादराची भावनाही नाथपंथातील विचारसरणीशी जुळती दिसते. ज्ञानेश्वरांनी पूर्वसूरींचे विचार नीट अभ्यासले असावेत असे त्यांचे ग्रंथ पाहताना वाटते. पैठणला गेल्यावर त्यांनी अध्यात्मग्रंथ पाहिल्याचे खुद्द नामदेवही सांगतात. वेद, उपनिषदे, गीता, भागवत, शांकरभाष्ये, योग वाशिष्ट इत्यादी अध्यात्म ग्रंथांचे संस्कार त्याच्या वाङ्मयावर झालेले दिसतात. पहिल्याच अध्यायाचे मंगलाचरण याचे उत्तम उदाहरण आहे. गणेश रुपकात आलेला वेद, स्मृती, अठरा

पुराणे, काव्यनाटके, षड्दर्शने, वेदांत, बौध्दमत, दोन्ही मिमांसा इ. या उल्लेख याची साक्ष देतो. दशोपनिषदे त्यांच्या जिव्हाग्री वसत होती. शंकराचार्यांच्या "शतश्लोकीची" छाप ज्ञानेश्वरीबर दिसते. ज्ञानेश्वरी व भागवताचा निकट संबंध पांगारकर सप्रमाण दाखवतात. परमात्म्याचे वर्णन "शून्य" या शब्दांनी ज्ञानेश करतात. ते योगवाशिष्ठयांप्रमाणेच. इतकेच नव्हे तर अमृतानुभवाचे नावही त्यांना योगवादीष्ठयावरून सुचले असावे. त्यातील आत्मभाव, स्फूर्तीवाद, शिवशक्ती समावेशन कल्पना, कल्पना, दृष्टांत-सिध्दीत यांचे योगवाशिष्टयाशी बरेच साम्य दिसते. ज्ञानेश्वरीतही याचा प्रभाव दिसतो.

त्यांच्या अभ्यासात "गीता-संबोधिनी" नावाचा ग्रंथ होता.[१] एवढी त्रोटक माहिती त्यांच्या चरित्रात मिळते. त्यांच्या वाणीवर प्राचीन ऋषीमुनींच्या तत्वज्ञानाचे दृढ संस्कार होते हेही जाणवते. वेदोपनिषदे, गीता, भागवत, अरण्यके, नारदीय सूक्ते या ग्रंथातील विचारांचा वापर त्यांच्या तत्वज्ञानात दिसतो. केवळ " " या शब्दातूनही सर्व उपनिषद वाङ्मय डोळ्यापुढे साकारते. तेरा व पंधराव्या अध्यायात सांख्य तत्वज्ञानाचा उल्लेख दिसतो. सहावा अध्याय योगशास्त्रावर आधारित आहे. नागपंथीय योगशास्त्रांवर आधारून हा अध्याय लिहिलेला दिसतो. दुसऱ्या अध्यायात पूर्वमिमांसाशास्त्राचे प्रतिबिंब दिसते. अकराव्या अध्यायात तेविसाव्या ओवीत पान खाणाऱ्या वानराकरवी रामाने रावणाचा पराभव केला हा उल्लेख रामायणाच्या अभ्यासाची साक्ष पटवतो. भागवतातील कथांचे संदर्भही बऱ्याचदा येतात. याचप्रमाणे आयुर्वेद, काव्यनाटके, साहित्यशास्त्र इत्यादींचाही प्रभाव त्यांच्यावर दिसतो. अभिनवगुप्ताच्या शांतरसाचा

---

१. डॉ. प्र. ल. गावडे – "संत ज्ञानेश्वरांचे व्यक्तित्व – एका चित्सूर्याचा शोध" ज्ञानेश्वर सप्तशताब्दी ग्रंथ – संपा. अशोक एरंडे, पा. ९३.

प्रभाव ज्ञानदेवांवी कसा आहे हे दाखवण्यासाठी डॉ. पद्माकर दादेगांवकरांनी स्वतंत्र लेख लिहला आहे.[१] ज्या काश्मिरी शैव मताचे अभिनवगुप्त उपासक होते त्या शैवमताचा ज्ञानदेवांवरील प्रभाव खुपरेकरांनी सोदाहरण दाखवला आहे. या सर्वांची येथे चर्चा करण्याचे प्रमुख प्रयोजन हे की ज्ञानेशांवरील वेदांचे पूर्वसंस्कार पाहता वेदांनी निसर्गाला दैवत मानले तसे ज्ञानेशांनीही निसर्गातच ईश्वराचे रुप शोधलेले दिसते. "जग आसकी वस्तुप्रभा" असे म्हणताना त्यांना या चराचरात ईश्वराचा साक्षात्कार झाला होता हे नक्की. हाच सांधा आपणास ज्ञानेशांच्या निसर्गप्रतिमांच्या वेडाशी जोडता येईल. प्रा. रा. श्री. जोग यांनीही आपल्या निवेदनात काव्य व तत्वज्ञान या दोन्ही बाबतीत तसेच शांतरसाच्या पुरस्काराबाबतीत ज्ञानेशांनी प्रत्यभिज्ञा मताचे पुरस्कर्ते अभिनवगुप्त यांचाच वारसा घेतला असावा असे म्हटले आहे. याहीपुढे जाऊन त्यांनी म्हटले आहे की, "काव्यविषयक कल्पना जर अभिरुचीच्या दयोतक समजावयाच्या असतील तर नरेंद्र, भास्कर व ज्ञानेश्वर या तिघांच्याही कल्पना जवळ जवळ सारख्याच होत्या असे म्हणावयास काहीच प्रत्यवाय दिसत नाही".[२] थोडक्यात असे म्हणता येईल की ज्ञानेशांनी तत्वज्ञानाच्या बाबतीत शंकराचार्यांचे अद्वैत तत्वज्ञान, वेदोपनिषदे इ. चा वारसा घेतलेला असून काव्याच्या बाबतीत व्यास, अभिनवगुप्त इ. पूर्वसूरींचे संस्कार उचललेले आहेत. वेदांनी निसर्गाला दिलेले प्राधान्य चराचरात परमेश्वरीरुप शोधणा-या ज्ञानेशांना अधिक रुचले असावे. निसर्गाचे निकट साहचर्य, निसर्गाचा नित्य सहवास यातून त्यांना निसर्गाबद्दल एक वेगळीच आपुलकी वाटली असावी. निसर्गाशी स्थापित झालेल्या या सहसंबंधातूनच त्यांची अलौकिक प्रतिमासृष्टी अवतरली असावी. निसर्गातल्या लौकिक गोष्टीनांही त्यांनी परतत्त्वाचा स्पर्श देऊन ज्ञानेश्वरीत अमर करुन टाकले असावे.

---

१. डॉ. पद्माकर दादेगांवकर -"ज्ञानेश्वर व अभिनवगुप्त"-"ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी ग्रंथ संपा. अशोक एरंडे - प्रकरण ९.

२. प्रा. रा. श्री. जोग-मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन-व्याख्यान दुसरे, प्रकरण ११, ज्ञानेश्वरांची काव्यविषयक दृष्टी- पान ४७.

## ज्ञानेश्वरांचे व्यक्तित्व -

ज्ञानेशांच्या व्यक्तिमत्त्वाकडे नजर टाकली असता एक अत्यंत महत्वाची गोष्ट आपल्याला नमूद करावी लागते ती म्हणजे त्यांच्या व्यक्तित्वाला दोन अंगे होती. एकाच नाण्याला दोन बाजू असाव्या किंवा शरीराच्या डावी व उजवी अशा दोन बाजू असाव्यात तशा ज्ञानेशांच्या व्यक्तित्वाच्या दोन बाजू आहेत. यातूनच ज्ञानेशांना कवी म्हणायचे की तत्वज्ञ असे वाद निर्माण झाले आहेत. तत्त्वज्ञानी लोक ज्ञानेशांच्या तत्वदर्शी व्यक्तित्वावर जोर देऊन त्यांना "तत्त्वज्ञ" ठरवतात. तर काव्यप्रेमी लोक ज्ञानेशांच्या काव्यदर्शी व्यक्तित्वावर भर देऊन त्यांना "कवि" ठरवतात. अर्थात हे दोन्ही ज्ञानेशांच्या एकाच अविभाज्य व्यक्तिमत्त्वाचे भाग आहेत. स्वामी शिवतत्त्वानंदांनी ज्ञानेश्वरांना कवी ठरवणा-या माणसांना चक्क महामुर्ख म्हणले आहे.[१] कारण त्यांना जर काव्यच करायचे होते तर त्यांनी कालिदासासारखा एखादा रमणीय विषय घेऊन आपखी एखादे "शाकुंतल" निर्माण नसते का केले असे ते विचारतात. ज्या माणसाला या भौतिक जीवनातुन लोकांना सोडवून पारलौकिकाचा मार्ग दाखवावयाचा आहे तो काव्य लिहिल का असे ते म्हणतात. याही पुढे जाऊन ते म्हणतात, "आपण त्यांच्या उपदेशानुसार स्वतःला उन्नत करावयाचे सोडून त्यांचा उपदेशच आपण आपल्या पातळीवर ओढून आणतो." स्वामी शिवतत्त्वानंदाचे हे भाष्य ऐकल्यावर क्षणभर आपल्यालाही संभ्रम पडतो की ज्ञानेशांना कवी म्हणावे की नाही ? केवळ तत्त्वज्ञ म्हटल्यास त्याचे काव्य नजरेआड करुन चालत नाही व केवळ कवि म्हणावे तर त्याचे तत्वज्ञान जाणून-बुजून दर्लक्षिल्यासम होईल. आपण त्यांच्या या दोन्हीही अंगांचा सविस्तर विचार करणार आहोत.

---

१. स्वामी शिवतत्त्वानंद -"श्रीज्ञानेश्वर - तत्वदर्शी आणि कवि" प्रकरण १ पान २२.

## तत्वदर्शी ज्ञानेश्वर -

मनन, निदिध्यास व श्रवण इत्यादिंनी प्राप्त होणा-या ब्रम्हज्ञानाचे निरुपण करणा-या "गीता" या अध्यात्मशास्त्रीय प्रबंधाचा "मराठी अवतार" सिध्द करणे ही ज्ञानेशांची प्रमुख भुमिका होती. गीतेच्या प्रत्येक शब्दाचे, श्लोकाचे व तद्‌गत तत्वज्ञानात्मक सखोल आशयाचे यथामूल व परिपूर्ण आकलन व्हावे ही ज्ञानेशांची मनीषा होती. ज्ञानेश्वरी हा मुळातच शास्त्रीय ग्रंथ असल्याने प्राचीन विचारवंताच्या परिभाषेनुसार ज्ञानेश्वर शास्त्रकवी आहेत म्हणूनच ते तत्वज्ञ ठरतात. त्यांनी उच्च नैतिक सद्‌गुणांचे पोषण करणारी जी तत्वे ज्या पंथात आढळली त्यांचा उत्साहाने स्वीकार केला. त्यांच्या विचारसरणीला सर्वत्र विवेकाचे दृढ अधिष्ठान लाभलेले दिसते. मग ते धर्मावरचे असो, भक्तीवरचे असो, नैतिक असो वा अध्यात्मिक. त्यांच्या दृष्टीने भक्ती म्हणजे डोळस, विवेकयुक्त, सुलक्षणी व मनुष्याला विवेकपूर्ण बनवणारी शक्ती आहे. ते स्वत: सिध्दप्रज्ञ योगी असल्याने योगमार्गाचे अघटित अग्निदिव्य त्यांनी प्रभावी व अनुभुतीपूर्ण शब्दांत मांडले आहे. त्यांचे सारे चित्त आर्त माणसाच्या अध्यात्मिक उन्नतिसाठी केंद्रित झालेले दिसते. शुध्दज्ञान व उच्च नैतिक मूल्ये यांची एकरुपता साधण्याचा त्यांनी पुरेपुर प्रयत्न केलेला दिसतो. विवेक, ज्ञान व उच्च नैतिक मूल्यांचे अधिष्ठान नसलेल्या निर्जिव नाटकी कर्मकांडाला अर्थशून्य ठरवून त्यांनी धर्म व नीती विचारात मोलाची भर घातली. निर्बुध्द, भावनाशून्य कर्मकांडाचा निषेध करून धर्माला ज्ञानाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. केवळ धर्मविधीचे भोगावर दृष्टि ठेवून आचरण करणे म्हणजे धर्माची विक्रीच आहे. जीवनातील श्रेष्ठ कर्तव्यांचे निर्ममबुध्दीने व निष्ठेने केलेले पालन हेच मानवाचे अंतिम साध्य व स्वधर्म होय असे सांगून त्यांनी धर्माला नैतिक मूल्यांचे, नैतिक मूल्यांना सविवेक ज्ञानाचे अधिष्ठान दिले. ज्ञानेशांचे हे कर्तृत्व त्यांना "तत्वज्ञ" ठरवण्यास पुरेसा पुरावा देते. विदया, बुध्दी, ज्ञान, विवेक, प्रज्ञा, बोध या तत्वांचे ज्ञानेश्वरीत वारंवार स्तवन आलेले दिसते. ज्ञानेशांना रसपूर्ण काव्य निर्माण करावयाचे नसून उच्च

उच्च तत्वज्ञानाच्या प्राप्तीची समर्थ साधने ज्यात आहेत त्या तत्वांच्या "ज्ञानाचे बोलणे" सांगायचे आहे व हे आत्मज्ञान शुध्द असले पाहिजे याकडे त्यांचा कटाक्ष आहे. प्रकृष्ट अध्यात्मज्ञान हेच त्यांनी परतत्व मानले आहे व ज्ञानाच्या प्रकाशात या परतत्वाचा सोहळा पाहण्याची, त्याचे ज्ञान प्राप्त करून ही "स्फूर्तिची पौर्णिमा" अनुभवण्याची त्यांची इच्छा आहे. आत्मज्ञान हेच सर्वश्रेष्ठ तत्व मानुन त्याची प्राप्ती हे ज्ञानाचे अंतिम साध्य आहे असे ते सांगतात. "दिसो परतत्व डोळा । पाहो सुखाचा सोहळा । रिघो महाबोध सुकाळा । माजि विश्व ।।" [ज्ञा. अ. १३-११६३] असे परतत्व त्यांच्या दृष्टीने महत्वाचे आहे. सो हमाव प्रतिती हेच अध्यात्म जीवनाचे साफल्य मानून ज्या मराठी भाषेतून परतत्व प्रतिती देण्याचा संकल्प ते करतात ती मराठी संस्कृतसम गीर्वाणवाणीशी स्पर्धा करण्याइतकी मोठी आहे. हेच त्यांना सिध्द करायचे होते.

"अतिंद्रीय परिभोगविन । इंद्रियांकरवी" ही त्यांची प्रतिज्ञाच होती. त्यांना मराठीतून "ब्रम्हज्ञानाचा सुकाळ करावयाचा होता. गीतेचा अर्थपूर्ण गाभा या सर्वसामान्यांना समजून घेता यावा, श्रीप्रभुची वाङ्मयमूर्ती शब्दचित्रित करता यावी या उद्देशानेच त्यांनी ज्ञानेश्वरीचे लेखन केले. त्यांना कवित्वाच्या अविष्कारासाठी लेखन करायचे असते तर भागवतातील रसाळ आख्याने त्यांनी निवडली असती. त्यांच्या लेखनात रसांचा उल्लेख, नागरपद बंधाचा हव्यास, शब्दकलेची जाण, रसाळ व कोवळे बोल, उपमाश्लेषांची कोंदाकोंदी असली तरी कविता निर्मिती हा त्यांच्या लेखनाचा हेतू नव्हता. ज्ञानेश्वरीतील अध्यात्म विवेचन, अद्वैत सिध्दांतकथन, कुंडलिनी विषयक विवेचन, हठयोगावरील भाष्य, योगमार्गाच्या अनुषंगाने केलेले अन्य योगांचे विवेचन या सर्व गोष्टी पाहिल्या की ज्ञानेशांना कवितेपेक्षा तत्वज्ञान अधिक अभिप्रेत होते हे कोणासही कबूल करावे लागेल. "गीता हे बोलाचे शास्त्र नसून "संसारजिणते शास्त्र" आहे. ते ज्ञानामृताची जान्हवी, आनंदचंद्राची सतरावी कला, प्रत्यक्ष परमेश्वराची उन्मेषलताच आहे" तिच्या ज्ञानाने मोहमुक्ती मिळते. इतकेच नव्हे तर

"म्हणोनि जगी गीता । मियां आत्मेन पतिव्रता ।" ही वस्तुस्थिती असल्याने आत्मज्ञान हाच गीतेचा प्रतिपादय विषय आहे. गीता म्हणजे वेदांचे मूळ सूत्र असून सर्व वेद गीतेच्या ठिकाणी बीजरुपाने अस्तित्वात आहेत. वेदांची मूर्त सुसेव्यता अशा या गीतेचे विवेचन करुन कृष्णाने जगाचे संसारा स्वढे ओझे फेडले असेही ते म्हणतात. [ज्ञा. १८ – १४२६ ते ७०] ग्रंथाचा विषय, त्याचा अधिकारी, ग्रंथामागील प्रयोजन, तात्पर्य वा फल या अनुबंध चतुष्टयाच्या आधारे ज्ञानेश्वरीचाही विचार केला तर ज्ञानेशांची भूमिका वा दृष्टि शुध्द तत्वज्ञाची अध्यात्मिक वा पारमार्थिक होती हे स्पष्ट होते. "अध्यात्मशास्त्री इये । अंतरंगचि अधिकारिये ।" असे ते स्वतःच सांगतात. ज्या माणसाला क्षेत्र क्षेत्रज्ञ विचार, द्वैताद्वैत विचार, प्रकृती पुरुष संबंध, क्षराक्षरविचार, आत्मविचार, आत्मस्वरुप, ईश्वर जगत् संबंध, विश्वरुपदर्शन, स्फूर्तीवाद या सम विषय आपल्या विवेचनात मांडायचे आहेत असा सत्पुरुष कवितेचा आश्रय करील काय ? ज्याने अतिंद्रीय सुखाची कल्पना समोर ठेवून आपले लेखन केले आहे तो इंद्रियजन्य सुखात रममाण होईल काय ? ज्या इंद्रियांच्या निग्रहासाठी त्यांनी योगमार्गाचे विवेचन केले, इंद्रिय संयमातुन मिळणा-या पारमार्थिक सुखाची अभिलाषा ठेवली असा योगी इंद्रियांना सुखावणा-या क्षणिक काव्यरसात स्वतःस गुरफटून घेईल काय ? हे सारेच विचार करण्याजोगे आहे.

ज्ञानेश्वरीतल्या ज्ञानी पुरुषाला काव्यात वहावत जाणे, भौतिक सुखात रममाण होणे मान्यच नाही. ज्ञानेश्वरी ही "काव्यग्रंथांचा राउ" असली तरी ती एका "साधकाची गाथा" आहे हे विसरुन चालणार नाही. "ज्ञानेश्वरी" ही देहभावातून देवभावाकडे नेणारी एका साधकाची गाथा आहे हे म्हणणेच खरोखर उचित ठरते. "ज्ञानेशांना" योगसुखाचे सोहळे" आपल्या भक्तांना अनुभव दयायचे होते. आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडवावयाचा होता. प्रत्येक श्वास प्रबंध करावयाचा होता. त्यांनी ज्ञानेश्वरी लिहली ती तत्वविवेचन म्हणून. आबालवृध्दांना हे तत्वविवेचन सुलभ व्हावे म्हणून त्यांनी थोडाफार रसपरिपोष साधला असेल. थोडया उपमा दृष्टांतांचा वापर केला असेल तर केवळ यावरुन

ज्ञानेश्वरीत काव्य ठरवणे म्हणजे शेपटीवरून संपूर्ण प्राण्याचा वा एखादया अवयवावरून संपूर्ण मनुष्याचा अंदाज करण्यासम ठरेल. तत्वविवेचन हा त्यांचा मूळ हेतू असल्याने त्यासाठी उपमांचा आश्रय करणे ही गोष्ट अपरिहार्य होती. उपमान हे ज्ञानाचे एक प्रमाण मानले गेले आहे. न्यायशास्त्राच्या दृष्टिने ते गौण असले तरी ज्या लोकांकरीता ज्ञानेश्वरी लिहली गेली त्यांच्या आकलनशक्तीच्या मानाने "शुध्द अनुमान" प्रमाणापेक्षा "उपमान प्रमाणांचा" वापर करणेच अधिक योग्य होते. या उपमा केवळ दोन गोष्टीतील सादृश्य, साधर्म्य व्यक्त करण्यासाठी वापरलेल्या दिसतात. - ज्ञानेश्वरांनी कवित्वापेक्षा तत्वविवेचन महत्वाचे असल्याने उपमादृष्टांताबाबत संस्कृत साहित्यशास्त्राचे संकेतही डावललेले दिसतात.[१] [उपमेय व उपमान भिन्न जातीक असू नयेत].

या सर्व विवेचनावरून आपणास एक गोष्ट मान्य करावीच लागते. ती म्हणजे कवी ज्ञानेश्वरांपेक्षा तत्वदर्शी ज्ञानेश्वर अधिक श्रेष्ठ ठरले आहेत. स्वामी शिवतत्वानंद आपल्या निबंधात म्हणतात, "ज्ञानेश्वर तत्वज्ञचिंतक नाहीत तर ते तत्वदर्शी आहेत. आमच्या सुखाला मिळालेल्या अतृप्तीच्या शापाचा परिहार व्हावा म्हणूनच हा "अमूर्तचि परि कारुण्याचा मूर्तु", आम्हाला स्वत:च्या प्रस्थान त्रयीचे- ज्ञानेश्वरी, अनुभवामृत, पासष्टींचे- मंगल वरदान देऊन गेला आहे".[२] माणसाला सुखाची खोटी लालूच दाखवून, स्वत:च्या नादी लावून मानवी जिवीत दु:खी करणाऱ्या या भोग्य वस्तू मिथ्या आहेत असे ज्यांनी सांगितले व या मिथ्या जगाला सत्य समजून हे लोक कवटाळीत आहेत असे सांगणारे ज्ञानेश या जगातील भासमान वस्तूला प्राधान्य देतील काय ? हे जग गंधर्वदुर्गासारखे, खपुष्पासारखे असून ज्ञानेश

---

१. ज्ञानेश्वरी अध्याय १२ - संपा. शं. वा. दांडेकर- व्हीनस प्रकाशन, पुणे रा. श्री. जोगांची प्रस्तावना - पान २९.

२. स्वामी शिवतत्वानंद- श्री ज्ञानेश्वर- तत्वदर्शी ज्ञानेश्वर- रामकृष्ण मठ, नागपूर, पान क्र. ३.

आपल्याला जग सोडायला सांगत नाहीत तर जगाविषयी आपली खोटी धारणा ज्या अपु-या, एकांगी अनुभवावर आधारली आहे तो अनुभव सोडण्यास सांगत आहेत. मी व माझे चिरपरिचित आभास मावळून आतबाहेर तो चिन्मय अनुभवाला येऊ लागला की ज्या अमृतानुभवाने शाश्वत सुखाची तृष्णा कायमची शमेल, ज्या चिद्‌विलासाच्या अनुभवाने तुम्ही सुखी होणार नाही तर सुखच व्हाल असा दिव्यानुभव ज्ञानेश्वर देऊ इच्छित आहेत. समुद्राला जशी तहान लागत नाही तशी तुमची अवस्था होईल असे ज्ञान ज्ञानेश आपल्या ग्रंथात देऊ इच्छितात. हा ब्रम्हानुभव मांडणा-या ज्ञानेश्वरांना कवी ठरवण्यात या लोकांना काय अभिमान वाटतो असेच स्वामी म्हणतात. हे लोक ज्ञानेशांच्या दिव्य वाणीचा, व्यक्तित्वाचा घोर विपर्यास करून त्यांना कवी ठरवून स्वतःच्या अपु-या मानदंडाने जोखुन मुर्खपणाव्यतिरीक्त दुसरे काही करीत नाहीत. जिथे ज्ञानेश्वरीतल्या उर्जस्वल यथार्थ जीवनमूल्याचे दर्शन घडवून जीवन रसायनाचा लाभ व्हावयाचा तिथे आपल्याला लाभतो काव्यरस. समग्र ज्ञानेश्वरी वाचूनही शेवटी एवढया थोर मार्गदर्शकाला कवी साहित्यिक ठरवून आपण पुन्हा अंधारात चाचपडत पूर्वीचेच जीवन जगण्यासाठी मोकळे होतो. या ब्रम्हसाम्राज्य दिपिकेच्या उजेडाने स्वतःच्या जीवनाचा अंधार उजळून घेण्याचे आपण स्वतःच नाकारतो आणि हे सर्व परत ज्ञानेश्वरीच्या सखोल संशोधनाचा पसारा मांडून, तिच्या सखोल अध्ययनाचा देखावा करून.

साहजिकच यामुळेच ज्ञानेश्वरीच्या सनिष्ठ अनुशीलनाने, श्रवण मनन अध्यासनाने विकृतीविण संसारदुःखा मोकलवणे [नाहीसे होणे] व मोक्ष पावणे या फलश्रुती निव्वळ भाकडकथा ठरतात. "काव्यरसात्मकं वाक्यं" यापासून "काव्य म्हणजे गेय सौंदर्य निर्मिती" पर्यंतच्या प्राचीन व आधुनिक काव्य लक्षणांमधील सर्व महत्वाची लक्षणे ज्ञानेश्वरीत आढळतात हे निश्चित. परंतु केवळ एवढया सुतावरून कित्येक पल्लवग्राही पंडितांनी तीला काव्य ठरवून ज्ञानेशांना महान कवी ठरवण्याचा स्वर्ग गाठला. ही विचार करण्याजोगी गोष्ट आहे. हे करताना बहुतेक अभ्यासकांनी फक्त ज्ञानेश्वरीचाच विचार

केला. ज्ञानेश्वरांचा नाही. यापैकी एकाही अभ्यासकाने ज्ञानेशांच्या जगविषयक अनुभवाचे स्वरुप व इतर कवींचा जगविषयक अनुभवाचे स्वरुप यातील फरक लक्षात घेतलेला दिसत नाही. ज्ञानेशांचे व्यक्तित्व व इतर कवींचे व्यक्तीत्व यात नेमका किती, कसा, कुठे फरक आहे याकडे दुर्लक्ष झाल्यानेच त्यांच्यासारख्या महापुरुषांच्या अमृतानुभवात डुंबुनही अंत:परिवर्तनाच्या दृष्टिने आपण कोरडेच राहतो. आपल्यासारख्या दुर्दैवी लोकांना आनंदाच्या केवळ आभासासाठी तोंडातून फेस गाळीत या मृगजळामागे धावण्यापासून परावृत्त करुन ख-या, स्वाधीन आनंदाचे संधान सापडावे म्हणून आपल्या "अनुभवास" व्यक्त रुप देऊ जाता, त्याचे द्वारा या ब्रम्हरसरुचिर, ल्हादैकमय प्रस्थानत्रयीची निर्मिती झाली. ते स्वत:च म्हणतात - "म्हणौनि भलतेने एथ सद्भावे नाहावे । प्रयाग माधवि विश्वरुप पहावे । येतुलेनि संसारासि दयावे । तिळोदल....." असे असताना ज्ञानेश्वरी रसिकांच्या मनोरंजनासाठी लिहली हे म्हणणे चुकीचेच नव्हे काय ? स्वानंद साम्राज्याचे चक्रवर्ती करुन सुखाची ददाद कायमची मिटवण्यासाठी जो ग्रंथ लिहित तो ग्रंथ क्षणिक काव्यसुखासाठी आहे असे म्हणणे म्हणजे अमृताला सरबताची उपमा देण्यासारखे आहे. ज्ञानेश्वरांच्या विचारांचा पैलूच [ Thinking Psyche ] उत्कृष्ठ होता. त्याचे मनोगुण भिन्न होते. म्हणूनच त्यांच्या लिखाणाला काव्य व साहित्य असे नाव देऊन त्यात संकुचितपणा आणणे अनुचित ठरेल. एका चिद्विलासाची अनुभुती शंकराचार्यांनी विचारातुन, ज्ञानेशांनी भावनेतून तर विवेकानंदानी कर्मातुन वर्णन केली आहे. केवळ एवढयावरुनच आपण शंकराचार्यांना तार्किक, ज्ञानेशांना कवी व विवेकानंदाना कर्मी ठरवुन आपल्या मुर्खपणाचे प्रदर्शन करीत असतो. थोडक्यात भावनाप्रधान माणसाच्या प्रत्येक अभिव्यक्तीत भावनाजन्य गुण दिसतात. ज्ञानदेवांच्या मनाच्या भावनेचा पैलू अधिक विकसित व परिपुष्ट होता. पण त्याबरोबर त्यांना अलौकीक शाश्वत आनंदाची प्राप्तीही झाली होती. त्यांच्या स्वत:च्या बोधात ज्ञानेश्वरही नव्हते व जगतही नव्हते होता फक्त अंतर्बाहय त्या विलायमाचा चिद्विलास. कल्याण कामनेने प्रेरित होऊन, सम्यक दर्शनास व्यक्त रुप देऊन या भाउक व्यक्तीने केलेला सहज सुंदर वाग्विलास म्हणजे वरवर काव्य वाटले तरी प्रत्यक्षात मात्र त्या अपरोक्ष

अनुभुतीचाच ललित अविष्कार होता. म्हणूनच केवळ ठिसूळ आधारावर ज्ञानेशांना कवी ठरवुन कालिदासादिंच्या पायरीस ओढणे म्हणजे केवळ मुर्खपणाच होय. उपनिषदातील "न तत्र सूर्योभाति" इ. मंत्राचे द्रष्टे वेदातील, वेदातील नासदीय सुक्ताचे ऋषी उद्गाते., भागवतातील राधाकृष्ण प्रेमाचे वर्णन करणारे संन्यासी प्रवर शुकदेव ज्या अर्थाने कवी त्या अर्थाने एकवेळ ज्ञानेश कवी ठरतील परंतु मग कालिदास, भास इ. कवींना काय म्हणावे हा प्रश्न उपस्थित होतो म्हणूनच कवी ज्ञानेशांपेक्षा तत्वज्ञ ज्ञानेश अधिक श्रेष्ठ ठरतात.

स्वामी शिवतत्वानंदांचे हे विचार मौलिक व विचार करण्याजोगे आहेत. अर्थात काव्यग्रंथाच्या विशिष्ट अभ्यासाची चौकट पुढे ठेऊन अभ्यासास बसणा-या समिक्षकांना हे विचार कितपत सुचतील यात शंका आहे. काही अंशी स्वामी शिवतत्वानंदाचे हे विचार पटण्याजोगे आहेत. कारण बहुतेक समीक्षक इतर कवी व ज्ञानेशांकडे एकाच चष्म्यातुन बघत असतात. त्याच्या नजरेला त्यातील काव्य दिसताच अल्पशा आधारावर ते त्यांना कवी ठरवून रिकामे होतात. आपण एकांगी दृष्टिकोनातून पहाताहोत याची त्यांना जाणीव नसते. ज्ञानेश्वरीतील काव्यापेक्षा ज्ञानेशांना तत्वज्ञानास प्राधान्य दयायचे होते. "बोली अरुपाचे रुप" दयायचे होते हे पाहिल्यावर ज्ञानेश तत्वज्ञ होते हे मान्य करावेच लागते.

## कवी ज्ञानेश्वर -

सामान्य, जिज्ञासू भाविक श्रोत्याची मने भाऊन टाकून त्या भारलेल्या अवस्थेतच ज्ञानाचे संस्कार करण्याच्या हेतूने ज्ञानेशांनी अलौकिक काव्यसौंदर्याची बहार करुन सोडली. हे अलौकिक कवित्व हा ज्ञानेशांच्या व्यक्तित्वाचा दुसरा पैलूच आहे. विश्वात्मक देवाच्या प्रसादाने त्यांनी नवनवोन्मेषशालीनी प्रतिभेचा प्रकर्ष केला. पांगारकर म्हणतात, "पक्व पूर्णतेच्या हजरीमुळे मनोज्ञ

झालेली मौक्तिके, शिंपलीमध्ये न सामावल्याने ती उकलावी आणि तिच्यातुन ती मौक्तिके ओघळावीत त्याप्रमाणे ज्ञानेशांच्या वेल्हाळ, प्रज्ञावेलीवर उमललेली भावसुमने अगदी हळुवारपणे खाली पडतात आणि पाहता पाहता त्यांचा भुरळ पाडणारा गालिचा तयार होतो."[1] ज्ञानेशांच्या दिव्य प्रतिभेच्या लतिकेतून हे नवे शब्दांकुर तरारू लागतात व भ्रमरसदृश रसिकांची मनोवृत्ती त्याच्या-भोवती रुंजु लागते. वर्षाकाळी खळाळत वाहणा-या असंख्य निर्झरानी पर्वत-शिखरे शोभावीत तसे ज्ञानेशाचे कवित्व सुंदर कल्पनाचित्रानी शोभून दिसते. लावण्यशोभेची सारी निधाने प्रकट होतात. सौंदर्याचे साम्राज्य प्रस्थापित होते. अमृताचा निर्झर त्यांच्या वाणीतून पाझरु लागतो. मायबोली मराठी अमृतापेक्षाही मधुर आहे हे त्यांनी दाखवून दिले. "तैसे साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ।। [ज्ञा. १३- २७६] पिकलेल्या सुखाचा परिमळ असणारे हे अमृताचे कल्लोळ जेव्हा अमृताशी पैजा जिंकू लागतात तेव्हा ज्ञानेशांच्या कवित्वाचे सामर्थ्य प्रकर्षाने जाणवते. ज्ञानेश्वर जातिवंत कवी आहेत. काव्यसौंदर्याची प्रत्येक कलाकुसर ते सूक्ष्म अवधान देऊन करतात. हे करताना प्रत्येक शब्द घासून पुसून घेऊन त्याचा वापर प्रभावीपणे व चपखलपणे करण्याकडे ते अधिक लक्ष देतात. म्हणूनच संस्कृतचा अट्टाहास धरलेल्या अतिरेकी व एकांगी माणसांना आपल्या विचारसरणीतील सौरस्य समजावून देऊन त्यांच्यात परिवर्तन करणे त्यांना शक्य झाले. आपल्या कवित्वाच्या बळावरच ते श्रोत्यांनाही श्रवणसुखाच्या शीतल मंडपात वसंताच्या समृध्द शोभेची अनुभुती आणुन देतात.

उच्चज्ञानाचे श्रीमंत वैभव मोठया आत्मविश्वासपूर्वक त्यांच्या दारात आणून ठेवतात. वास्तविक तत्त्वचर्चा व कवित्व ही सामान्यत: एकमेकापासून अतिदूर असतात. परंतु आपल्या असामान्य प्रतिभेच्या सहाय्याने या दोन्हींची त्यांनी एकमूस करुन टाकली. त्यांची तत्त्वचर्चा काव्यरसात न्हाऊन निघाली. व कवित्वाला तत्त्वज्ञानाची गहन बैठक लाभली. तत्त्व व कवित्व, साहित्य व

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. पांगारकर मराठी वाङ्मयाचा इतिहास-खंड पहिला- विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे प्रस्तावना - रा. शं. वाळिंबे - पान १०२.

शांती, रसिकता व अध्यात्म या परस्पर भिन्न गोष्टीत त्यांनी अफलातून "अद्वैत" साधले. आपल्या वाक्चातुर्याने लोकांना सुखी करून बोलीनी "अरूपाला रूप" देऊन अतिंद्रिय ते इंद्रियाकरवी भोगवण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी होते. म्हणून त्यांचा ग्रंथ "काव्यराज" होऊन "गरूवतीच्या ठायी" बसण्यास समर्थ ठरला. त्यांनी ज्ञानेश्वरीचे बाहयांग मोठे रेखीव, छोटीव व प्रमाणबध्द केले आहे. रसाळपणाच्या लोभाने "श्रवणालाही जिव्हा फुटतील" असे शब्द योजून त्या शब्दातील अर्थाचा गाभा न समजताही केवळ बाहय सौंदर्यावरही रसिक खिळून राहिल अशी शब्दयोजना ते करतात. त्यातील मितव्यय, समर्पकता, अल्पाक्षररमणीयत्व या मितल्या बोलांचे कोवळेपण खरोखर वाखाणणीय आहे. त्यांनी भावना, कल्पना, रस व अलंकार ही काव्याची चतुर्विधांगे उत्तम रीतीने पोसलेली दिसतात. अलंकाराला मागे टाकील असा रसपरिपोष व इंद्रियांना कव्यंभा" लावोल असे अलंकार वैभव हे त्यांचे खास वैशिष्टय आहे. "शृंगाराच्या माथ्यावर पाय ठेवणारा" शांत रस नवरसांनाही आपल्या बरोबर घेऊन येतो अशा दशरसांचा उत्कृष्ट परिपोष साधतांना ज्ञानदेवांची प्रतिभा जण काही अमृत रसवंती होते. त्यांच्या जिव्हाळ्याचे विषय आले की तर ही प्रतिभा अशी काही उचंबळून येते की बस्स ! काव्याचे कल्लोळच कल्लोळ सर्वत्र खळखळू लागतात. सद्गुरू, श्रोते, मराठी भाषा, गीता व कृष्णार्जुन योग हे पाच विषय म्हणजे त्यांच्या रसपरिपोषाचे पंचप्राणच होतात. त्यांचे दृष्टांत व रुपकचातुर्यही अभ्यासण्याजोगे आहे. त्यातील सूचकता, समर्पकता लक्षात घेण्याजोगी आहे. त्यांच्या अलंकारसृष्टीकडे वळले म्हणजे त्यांच्या कल्पकतेची उंची लक्षात येते. त्यांना तत्कालीन अलंकारशास्त्र चांगले ज्ञात होते. त्यांनी योजलेल्या अलंकारात उपमा दृष्टांतावर अधिक भर दिलेला दिसतो. त्यांच्या उपमेत विशदता व वेधकता हे दोन्ही गुण प्रकर्षाने जाणवतात. मालोपमा व मालादृष्टांत यांची तर नुसती रांगच रांग लावतात. तरीही प्रामुख्याने सांगरुपकावर ते अधिक भर देताना दिसतात. एकनाथांच्या अध्यात्मिक रूपक पध्दतीचा पाया ज्ञानेशांपाशीच रचलेला दिसतो.

अलंकार सृष्टीतले वैविध्य हा त्यांचा उल्लेखनिय विशेष आहे. यच्चयावत् चराचर सृष्टी, सामाजिक समजुती, नानाविध कविसंकेत यांचाही वापर यात केल्याने ही अलंकारसृष्टी सामाजिक दृष्टयाही महत्त्वाची ठरते. या सर्व गोष्टीतून ज्ञानेश हाडाचे तत्ववेत्ते असले तरी अंत:करणाचे कवी आहेत याची खात्री पटते. साहित्याचे सर्व गुण त्यांच्या कलाकृतीत दिसतात. रसपरिपोषक, व्यापकार्यसूचक, परमार्थस्पर्शी, रेखीव अशा शब्दांचा मेळावा जणू काही ते आयोजित करतात. या नादमधुर अक्षर मेळाव्याने सर्वेंद्रिये सुख पावतात. वाणी व अर्थ यांचे अद्वैत, नादमाधुर्य, येथे प्रकर्षाने अनुभवास येते. त्यांच्या मनातील अर्थ जणू काही बोलाचीच वाटपहात असतो. बोल प्रकटताच पाठोपाठ अर्थ धावतो, भावार्थाचा फुलोरा निर्माण होतो. "पदनागर बंधांची" डौलदार रचना रसार्थाचे घट भरुन ठुमकत जाऊ लागते. आणि मग मराठीच्या अंगणात लावलेले सारस्वताचे झाड रसभाव फुलांनी नानार्थ फलभारांनी झुकून जाते. या सर्व गोष्टीचा तात्पर्यार्थ एवढाच काढता येईल की काव्यसाधन शब्दापासून काव्यात्मरसापर्यंत साहित्याची सर्व अंतर्बाह्य साधने ज्ञानेशांनी असामान्य कौशल्याने वापरलेली दिसतात.

केवळ वाक्जाल निर्मून त्यात स्वत: गुंतुन रसिकांना गुंडाळण्याची त्यांची वृत्ती नव्हती. तर भावार्थाच्या गिरीवर, साहित्यसोन्याच्या खाणी उघडून त्यातून हे "ज्ञानियाचे लेणे" त्यांना घडवावयाचे होते. त्यांच्याच शब्दात सांगावयाचे तर जो रोग दुधसाखरेच्या पथ्याने बरा होतो त्यासाठी कडूलिंबाचा रस पिण्याचे कारण नाही. श्रवणसुखाने मोक्षप्राप्ती होत असेल तर धरपटादी श्रम कशाला हवेत ? म्हणूनच त्यांनी कवित्वाची कास धरलेली दिसते व रसिकतेच्या प्रवाहाने वहात जाऊन श्रोत्यांना परतत्वस्पर्शाचा अनुभव दिलेला दिसतो. वृत्तीचा कोवळेपणा, सौंदर्याची खोल जाण, शब्दकलेची नाजूकता, उपमादृष्टांतांची समर्पकता, व प्रसन्न शैली हे त्यांच्या कवित्वाचे ठळक विशेष सांगता येतील.

ज्ञानेशांना रूक्ष समिक्षकाच्या नजरेतून कुठल्या सिध्दांताचे टिकाटिप्पण करावयाचे नव्हते. उलट त्यांची टिकादृष्टी एका रसडोळस कलावंताची होती. म्हणूनच खंडनमंडणाच्या घनदाट जंगलात शिरुन स्वत:ला हरवून बसण्यापेक्षा त्यांनी जे मनाला भावले, स्फूर्तीप्रद वाटले त्याचाच अविष्कार केला. टीका म्हणजे तर्ककर्कशपणा, अनुमान, युक्तिवाद, कोटीक्रमांची रेलचेल, विचारांची सूक्ष्मता, पांडित्य प्रदर्शन व फाजिल अभिनिवेश ही व्याख्या त्यांच्यामुळे बदलावी लागली. त्यांनी टिकेला रसग्रहणात्मकरुप दिले. सामान्यजनांना समजतील अशी अध्यात्मिक भावतत्त्वे सादर केली. त्यांचे तत्त्वज्ञानच आत्म-प्रत्ययातून फुलले असल्याने त्यांचे ग्रंथ पंडिती वळणाचे न होता सुवर्णक्रांती, प्रमदेचे रुप, पुष्परंग व गंध यांनी युक्त असे झाली. ज्याकाळी मराठीचा तितकासा मनोवेधक विकास झालेला नव्हता की विकास करणारा राजाश्रय नसताना देखिल एका कोवळ्या पोराने आपल्या प्रतिभेचा हा अतुलनीय चमत्कार दाखवावा हे खरोखर विचार करण्याजोगे आहे.

गीतेतल्या तत्त्वज्जड तत्त्वज्ञानाचे विवेचन, निरर्थक धर्मकल्पनांचे खंडन, जातीयतेवर टिका या पार्श्वभुमींवर ज्ञानेशांचे हे नवनवोन्मेषशाली प्रतिमातरंग परस्पर विरोधातले सौंदर्यच दाखवुन दाखवतात [ contrast beauty ] किंबहुना तर्कशुध्द विवेचन यथातथ्य भाषेत करण्याऐवजी ज्ञानेश खुशाल आपल्या रसाळ काव्याची मोहक विलसिते उलगडू लागतात. चंचल समिरण लहरीबरोबर स्वच्छंदी पाखराने वाऱ्यावर स्वत:ला खुशाल झोकून दयावे. तद्वत त्यांचे मन विषयानुसंधान सोडून प्रतिभाविलासाबरोबर वाहवु लागले.

"माझी प्रज्ञावेली वेल्हाळ । कार्य होय सकळ । तो वसंत होयी स्नेहाळ । शिरोमणी ।। [ज्ञा. १४-२१]

अशी त्यांची भुमिका असली तरी, "रस होति बोलणो अक्षरांसि ।।" हा त्यांचा भावप्रत्यय आहे. "बांधिली तोडित । बुडाली काढीत ।।" या भावनेने टोका लिहल्यानेच तत्त्वांना रसार्द्रता लाभून शब्दांना भावनेची डूब लाभली.

"हेन्री थॉमसच्या भाषेत सांगायचे झाले तर," The stylful artist in wards can thus be a musician and a painter and a writer in one. A good poem sings and paints and philosophizes हाच प्रत्यय ज्ञानेश्वरीत येतो. जणू काही संध्याकाळी पश्चिमेच्या मुखावरचे मोहक रुपांचे संमेलन पाहात असताना सागरतीरी पुळणीवरच्या गार गालिच्यावर विसावून नाजूक लाटांचे रम्य नर्तन नेत्रात साठवित असताना माडांच्या कानात कुजबुज करीत सुगंधाची लयलूट करणा-या व .शीळ फुंकणा-या समिराचे हास्य पाहताना जसे मनात कवित्व उमलून येते तसे अंत:करणातील तीव्र भावभक्तीला व जनमनातील अपार कारुण्याला आलेली रसांची भरती म्हणजे ज्ञानेश्वरी होय.[१] " हे दत्ता भोसलेंचे उद्गार सार्थच ठरतात. थोडक्यात पदयबध्दता, उत्प्रेक्षा रुपक उपमा इ. अलंकार योजना, यमकादी अलंकार, कल्पनाविलास, माधुर्यादि गुणांनी शब्दरचना, शब्द व अर्थचमत्कृती या गोष्टींच्या सहाय्याने आपले कवित्त्व फुलवावे अशी ज्ञानेशांची मनिषा असावी. परंतु या काव्यास परतत्वाचा स्पर्शही देऊन त्यात "अक्षरत्व" आणण्याचे त्यांचे धोरण असावे. त्यांचे कवित्व एवढयावरच थांबत नाही तर त्यांनी रुपवत्तेकडे खास लक्ष पुरवलेले दिसते.

"काव्य जेव्हा प्रयोगावस्थेस पोहोचण्या इतके प्रत्यक्षवत् होईल तेव्हाच त्यात रसास्वादाची संभावना येईल" हे भट्टतोताचे शब्द प्रमाण मानुन त्यांनी ज्ञानेश्वरीला एखादया नाटयप्रयोगाचा रचनाबंध दिलेला दिसतो. त्यासाठी ते संवादाला महत्व देतात. त्यामुळे नाटयमयता वाढते. संवाद, सरस व्यक्तीरेखा, सरस प्रसंग या त्रिमित परिणामांनी नाटयमयता वाढवून त्यांनी ज्ञानेश्वरीचा रुपवत्तायुक्त आकृतीबंध निर्माण केलेला आहे. जणू काही "विदग्धा रसवृत्ती म्हणिपैल कथा ।" [अ. १०-४०] असे त्यांना म्हणावयाचे आहे. दृश्य

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. संपा. द. वा. भोसले - "ज्ञानेश्वरी अध्याय १" प्रस्तावना- पान २९-३०.

रंग, स्पर्श, नाद, गंध अशा पंचसंवेदनात्मक असंख्य प्रतिमातुन सुध्दा त्यांनी हा काव्य प्रभाव साधला आहे". आत्माचे रुप उपाधिरहित स्वरुपात सांगता येत नाही. त्याला कोणत्याहि चित्रवृत्तीच्या रंगात रंगवुनच चित्रित करता येते. हे शांतरसावरील अभिनव गुप्ताचे निरीक्षण त्यांना मान्य होते. हेच ज्ञानेश्वरीत जाणवते. परंतु कुठल्याच प्राचीन वा समकालिन कवींचा साचा त्यांनी पत्करलेला दिसत नाही. मम्मट, विश्वनाथासारख्या साहित्य-शास्त्रकारांच्या काव्यचौकटीला, रुढ काव्यसंकेताना त्यांनी फाटा दिलेला दिसतो. त्यांच्या कल्पनाविलासा इतकीच त्यांची भाषाशैली महत्वाची आहे. भाषाप्रौढी, भाषासौष्ठव व भाषाविलास या तिहिंचा एकत्रित संगम आपणास त्याच्यात दिसतो. "कोवळिक दुणावणारे, अमृतालाही कमीपणा आणणारे माधुर्य त्यांच्या वाणीत आहे याची प्रचिती हरेक ओवीत येते. ते स्वत:च म्हणतात. "या शब्दांच्या कोमलपणापुढे नादांचा कोमलपणा नि सुस्वरतेचे नाना प्रकारही अपुरे पडतील". सुगंधाची सुग्ध मधुरता फिकी पडेल या शब्दात एवढी रसवत्ता आहे की कानालाही जिव्हा फुटतील आणि खरोखर श्रवणाचा विषय असलेला हा शब्द आपलाही विषय आहे या भावनेने सा-या इंद्रियामध्ये भांडण जुंपेल". अर्थाबरोबर शब्दांचे नाद, गुण, रंग, रुप सौकुमार्य, कांतिमत्व, रंगसौंदर्य या गुणांनाही त्यांनी महत्त्व दिले आहे. म्हणूनच त्यांची हरेक ओवी "वोविया होती लेणे । साहित्याशी ।।" या योग्यतेस पात्र झाली आहे.

ज्ञानेशांच्या कवित्वाबद्दल स्वामी शिवतत्वानंद मोठे मार्मिक विचार मांडतात. मात्र ते मांडताना ते इतर कवी व ज्ञानेशांच्या प्रतिभेत्ला महत्वाचा फरक दाखवतात. ज्ञोनशांच्या भाषेत जी "रसवेली वेल्हाळ" आढळते तो रस कोणता तर, "रसो वै स:, रसं हि एव अयं लब्ध्वा आनंदी भवति, यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ।" म्हणजेच मी-तु बोधुयुक्त मन व तु तो द्वैतबोध व्यक्तवणारी वाणी यांच्या संकुचित कक्षेबाहेर त्या रसाचे अधिष्ठान आहे. अंतर्बाहय जेव्हा तो लीलामय अनुभवास येतो त्यावेळी हा रस अविर्भुत होतो.

लोकातीत रसानुभुतीचे ज्या ज्ञानेशांनी अलौकिकानंद छंदातुन उद्गार केले ते ज्ञानेश्वर कविश्वरच होत. सम्यक दर्शनालाभाने ज्याला विश्वातील सर्व वस्तूंचे गुढ स्वरूप, रहस्य कळले आहे असे ज्ञानेश खरे कवी होत. मात्र त्यांना पुरातन ब्रम्हकथा, चिरंतन तत्वगाथा, मधुरस्पंदी भावसंगीतातून गावयाची होती इतकेच. वरवर पाहता इतर कवी व ज्ञानेशांच्यात अभिव्यक्तीत, लालित्यात साम्य दिसते. परंतु सूक्ष्म दृष्टीने पाहिले की या दोघांच्या अनुभवात, जगात, व्यक्तितत्त्वात, प्रयोजनात बरीच तफावत दिसते.

ज्ञानेशांच्या अंतरंगातील शिवमय अनुभुती अमनी मनाच्या निष्कलंक माध्यमातुन भावकोमल छंदातुन एखादया निष्कलंक स्फटिकगृहात तेवणा-या दिपीकेची प्रभा बाहेर पडते. तशी भावकोमल छंदातून प्रकट होते. जणु काही "सद्‌भाव जीवगत । बाहेर दिसती फाकत । स्फटिक गृहिचे डोलत । दिप जैसे ।।" हीच अनुभुती तेथे येते. या सर्वच गोष्टींचा संकलित विचार केला असता ज्ञानेश्वर हे अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे प्रतिभावंत कवी होते हे मान्यच करावे लागते. अर्थात यातील कोणत्याच एका अंगावर भर दिला जाऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विपर्यास केला जाऊ नये एवढाच स्वामी शिवतत्वानंदाचा अट्टाहास आहे.

## ज्ञानेशांचा समन्वयवाद -

ज्ञानेशांनी कोणत्याच बाबतीत टोकाची भुमिका घेतलेली दिसत नाही. उलट त्यांच्या व्यक्तित्वात नव्याजुन्याचा उत्कृष्ट समन्वय साधण्याचा गुणच अधिक जाणवतो. " Think not that I am come to destroy the law , or the prophets, I am not come to destroy but to fulfil". ही येशुख्रिस्त प्रणित दृष्टीच त्यांनी ठेवली होती. जे जे शास्त्रवचनात सांगितले आहे ते आचरणात आणून उक्ती व कृती यांचा सुयोग्य मेळ साधुन उपासना मार्गातील उपचारांची, संकेतांची हकालपट्टी न करता फक्त त्यांच्यातील

कालामुळे आलेली जडत्व काढून टाकून त्यांना एका उदात्त जाणीवेच्या व नव्या भक्तीकल्पनेच्या सूत्रात गुंफण्याची त्यांनी पराकाष्ठा केली. आपले सहजसुलभ व नाविन्याने नटलेले विचार सांगतांना त्यांनी कुठेही एकांगी वा आग्रही भुमिका घेतलेली नाही. कोणत्याहि भाष्यकाराचा ते सहीसही अनुवाद करीत नाहीत. उलट त्या मतामतामधील सत्य, तत्त्व व सुंदरता वेचून त्यातील विचारांचा त्यांनी समाजोन्नतीच्या दृष्टीने समन्वय साधलेला दिसतो. यातूनच समाजाला जीवनाकडे पाहण्याची जिवंत व जातिवंत अशी नवी दृष्टि मिळाली. त्यांनी कोणत्याच विचारसरणीतील टोकाची भुमिका न स्वीकारता त्यातील अतिरेकी एकांगीपणाची तीव्रता कमी केली. व चांगले तेवढे स्वीकारले.

त्यांनी शुध्द ज्ञान व उच्च नैतिक मुल्ये यांच्यातही योग्य समन्वय साधला. ज्ञान व धर्माची परस्पर सांगड घालणे, त्यांना उचित वाटले. सद्वस्तु व असद्वस्तु, योग्य व अयोग्य, उचित व अनुचित, ग्राहय व अग्राहय यांच्यातील तात्त्विक भेद जाणून विवेक व ज्ञान यांचाही सुयोग्य मेळ त्यांनी घातला. नीतीमुल्ये, कृतार्थज्ञान, धर्म, विवेक व डोळस श्रध्दा या गोष्टींच्या समन्वयातूनच त्यांनी आपले तत्त्वज्ञान मांडले. धर्मविचार व नीतीविचारांची परस्पर सांगड घातली. प्रचलित समाजव्यवस्थेतील व धर्मसंस्थेतील बोचणारी शल्ये कौशल्याने काढून टाकून वा त्यांची अग्रे बोथट करुन धार्मिक विधी-विधानाला व सामाजिक आचारांना ज्ञानाची व उच्च नैतिक मूल्याची जोड देऊन त्यांनी समन्वयवादाची कास धरली. सदसद्विवेक बुध्दी बरोबर उदात्त भावनांची जोपासना केली. समाजाच्या हृदयपरिवर्तना बरोबर वैचारिक क्रांतीची आस धरली. प्रत्येक जुनी परंपरा, जुना आचार बेदरकारपणे ठोकरुन लावण्याचा अडाणी धटिंगणपणा वा समाजाच्या मनात असलेल्या हळव्या व पवित्र श्रध्दांच्या चिंध्या करून टाकण्याचा उन्मत्तपणा त्यांच्यात नव्हता.

तसाच जुन्या परंपरेतील, आचारविचारातील सारे जसेच्या तसे स्वीकारण्याचा निर्बुध्द वेंधळेपणाही त्यांच्यात नव्हता. आक्रस्ताळेपणा, खोटा

अभिमान न ठेवता प्राचीन परंपरेतील अग्राहय व कालबाहय भाग काढून टाकून सुयोग्य भाग तेवढाच स्वीकारायचा असा डोळस उदारमतवाद त्यांच्यापाशी होता. संस्कृतमधील ऐश्वर्य, भाषासौंदर्य व मराठीतील साधेपणा यांचाही सुयोग्य मेळ साधून त्यांनी संस्कृतला न दुखावता मराठीचे श्रेष्ठत्व सिध्द केले. केवळ "ज्ञानाचे बोलणे" न करता "ज्ञानाला रसपूर्ण काव्याची गोडी प्राप्त करून दिली. त्यांना केवळ तत्त्वज्ञान सांगून लोकांना शहाणे करायचे नव्हते तर लोकांच्या भावनांना आव्हान करून त्यांच्या हृदयात हा अध्यात्माचा अमृतकल्लोळ उतरावयाचा होता. तत्त्वज्ञान व काव्य यांचा इतका सुयोग्य समन्वय कोणत्या संतांच्या व कवीच्या ठिकाणी आपणास पहायला मिळत नाही.

योग, भक्ती व तत्त्वज्ञानाच्या या समसमासंयोगामुळेच डॉ. तुळपुळे त्यांच्या व्यक्तित्त्वाचे रेखाटन करताना म्हणतात, "ज्ञानेश्वर योगी होते तसेच भक्तही होते. तत्त्वज्ञ होते असे कवीही होते. त्याच्या ठायी वसत असलेल्या रसिक व गंभीर प्रवृत्तीचा मनोहर संगम ज्ञानेश्वरीत आहे. त्यांची दिपवणारी विद्वत्ता, उत्तुंग कल्पनाविलास, अमाप शब्दसंपत्ती, सूक्ष्मावलोकन, हृदयंगम नाटय, नादयुक्त ओघवती शैली व त्यातून फुलणारे कवित्त्व आणि त्यांच्या व्यक्तिगत संतत्वामुळे ज्ञानेश्वरी रचनेच्या हेतूमधून अपरिहार्यपणे डोकावणारे साधुत्व हे सर्व त्यांच्या ग्रंथात एकवटले आहे. कर्पूरात शुभ्रता, मृदुता व सौगंध्य असते त्याप्रमाणे ज्ञानेश्वरीत विद्वत्त्व, साधुत्त्व व कवित्त्व यांचा त्रिवेणी संगम झालेला आहे."[१] यातूनच ज्ञानेशाचे समन्वयवादी व्यक्तित्त्व आपणास स्पष्ट जाणवते. एखादया कुशल कलावंताने शब्द, संगीत व चित्रमयता यांनी युक्त अशी कलाकृती निर्माण करावी तद्वत ज्ञानेशांनी अध्यात्म, काव्य व

---

१. शं. गो. तुळपुळे - "पाच संतकवी" - सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे.

भक्ती यांच्या सुसंयोगातुन आपली ज्ञानेश्वरी निर्माण केली आहे. स्वत: ते म्हणतातच, "वाचे बरवे कवित्व । कवित्वी रसिकत्व । रसिकत्व परतत्त्व । स्पर्शु जैसा ।।" यातुनच त्यांचा समन्वयवादी दृष्टिकोन प्रत्ययास येतो. कोणत्याही हट्टाग्रही एकसूरीपणा, एकांगी विचारसरणी, एकाच विशिष्ट विचारसरणीवर दिलेला जोर, आपलेच खरे मानण्याची अट्टाहासी वृत्ती त्यांच्या ठिकाणी दिसत नाही. याला कारण यांची समन्वयवादी दृष्टीच होय.

## ज्ञानेश्वर व इतर कवी यांच्यातील फरक -

ज्ञानेशांना कवी किंवा ज्ञानेश्वरीला काव्य ठरवताना अभ्यासक केवळ ज्ञानेश्वरीचाच विचार करतात, ज्ञानेशांचा नाही. ज्ञानेश्वरीला काव्य ठरवताना व ज्ञानेशांचा "महाकवी" म्हणून गौरव करताना आपण एखादया महत्वाच्या गोष्टीकडे लक्ष दयावयास हवे ती म्हणजे ज्ञानेशाचे व इतर कवीचे व्यक्तिमत्त्व समान आहे काय ? की त्यात काही फरक आहे. चिकित्सक दृष्टिने विचार केल्यास इतर कवी व ज्ञानेश्वर यांच्या व्यक्तित्वात काही मूलभूत भेद जाणवतात. ते भेद कोणते, कुठे, किती व कशा प्रकारचे आहेत हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय बनेल. प्रथम आपणास पटावे लागते ती त्यांची स्वत:विषयीची व जगाविषयीची अनुभुती. त्यांना या सृष्टीत अंतर्बाहय एकाच चैतन्याचा विलास अनुभवास येतो. "सुताचिये गुंजे । आतबाहेर नाही दुजे । " ही जाणीव त्यांना होती. "मूलायाग्राय मध्याय मूलमध्याग्र मूर्तये । क्षीणाग्रमूलमध्याय नम: पूर्णाय शंभवे ।" हाच चिद्‌विलासानुभव ते घेतात व हाच अनुभव ते आपल्या काव्यातुन प्रकट करतात. जिथे मी-तु पणाची जाणीव नसते, भोक्ता-भोग्य व भोग असा बोध नसतो या भूमाचा अनुभव त्यांनी घेतला होता.

जडचेतन, नर-नारी, कुमार-कुमारी, सुंदर-असुंदर, सुख-दु:ख सर्व काही तोच भिन्न भिन्न उपाधींनी उस्फूर्त झालेला आहे. आपल्या मायाशक्तींनी

प्रतियमान होत आहे. ही त्यांची जगाबद्दलची कल्पना होती. त्यांचे स्थितप्रज्ञ व्यक्तिमत्त्व, अपरोक्षानुभुती त्यांच्या काव्यातुन, शब्दातुन, उपमा-दृष्टांताची छंदोमयी लोभसरूपे घेऊन साकार झालेली दिसते. इतर कवींच्यात हे तादात्म्य असले तरी त्यांच्या निसर्ग व आत्मानुभुतीला लौकिकाच्या मर्यादा असतात. सा-या सृष्टीत त्यांना परमेशाचे दर्शन घडले तरी सृष्टीतील प्रत्येक गोष्टीत ते लौकिक सुखदु:खाचीच प्रतिबिंबे, भौतिक अनुभुतीच अधिक शोधत असतात. त्यामुळे सामान्य कवीची काव्यानुभुती भव्यदिव्यतेच्या पातळीवर गेली तरी ज्ञानेशांच्या अपरोक्ष, अतिंद्रीय अनुभुतीच्या पातळीपेक्षा खालच्याच दर्जाची असते. त्यांच्या काव्यातुन प्रतीत होणारे विश्व हे भौतिक सुखात रममाण होणारे, निजस्वार्थाभोवती भिरभिरणारे असेच असते. ते क्वचित प्रसंगी पारलौकिकाच्या पातळीवर जातेही पण लौकिकाची आसक्ती पूर्णत: सोडू शकत नाही हाच ज्ञानेश व इतर कवींच्या अनुभुतीतला मूलभुत फरक आहे.

दुसरा फरक येतो तो प्रयोजनातला. आपल्या सारख्या संसारतापात होरपळणा-या पामरांना आनंदाच्या केवळ आभासासाठी तोंडातून फेस गाळीत या मृगजळामागे धावण्यापासून परावृत्त करुन ख-या स्वाधीन आनंदाचे संधान सापडावे म्हणून आपल्या अनुभवाला व्यक्तरूप देण्यासाठी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी या ब्रम्हरसरुचिर प्रस्थानत्रयीची निर्मिती झाली. आपले प्रयोजन सांगताना स्वत: ज्ञानेशच म्हणतात, "म्हणौनि भलतेणे एथ सद्भावे नाहावे । प्रयागमाधवी विश्वरूप पाहावे । घेतुलेनि संसारासि दयावे । तिलोदक ।।" ज्ञानेशांना अवघाच संसार सुखाचा करून तिन्ही लोक शाश्वत आनंदाने भरून टाकावयाचे होते. या उदात्त हेतूने ज्ञानेश्वरीची निर्मिती झाली. या जगाला जीवनाच्या भगभगीपासून, कटूतेपासून मुक्त करून स्वानंद साम्राज्याचे चक्रवर्ती करुन त्यांची सुखाची ददात्त कायमची मिटवण्यासाठीच त्यांनी आपले लेखन केले. ज्ञानेशांच्या या प्रयोजनाला शाश्वताची, परतत्वाची पार्श्वभुमी आहे. त्यांच्या प्रयोजनामागे असलेली उदात्तता फार महत्त्वाची आहे. त्यात अवस्था विश्वाचे कल्याण अभिप्रेत आहे. "जो जे वांछिल" ते ते

देण्याची ग्वाही आहे. सा-या विश्वाचे आवार ब्रम्हानंदाने भरण्याची लालसा आहे. अवघे जन शहाणे करून सोडण्याची प्रांजळ इच्छा आहे. तशी अमृतातही पैजा जिंकण्याची प्रतिज्ञाही आहे.

ज्ञानेशांच्या या प्रयोजनाचा विचार केल्यानंतर सामान्य कवीचे काव्य प्रयोजन व "त्याचे" काव्यप्रयोजनात असलेला जमिनास्मानाचा फरक प्रकर्षाने जाणवेल. इतर कवी काव्य "आनंदप्राप्तीसाठी" लिहतात. "काव्य" यशसे अर्थकृते व्यवहार विदे शिवेतरक्षतिये सद्यः परनिर्वृत्तये इति प्रयोजनात्" अशी मम्मटाने सांगितलेली काव्यप्रयोजने प्रत्येक कवीला कमीजास्त प्रमाणात अभिप्रेत असतातच. ब-याचदा कवी पैसा व प्रसिध्दी या हेतूनेच काव्यनिर्मिती करताना दिसून येतात. आनंदप्राप्ती, व्यवहारशिक्षणही देखिल त्यांची प्रयोजने असतात. यात अलौकिकाचा भाग कुठेच दिसत नाही. कवी आपल्याच समाधीत रममाण होऊन "स्वात्मसुखाय" काव्यनिर्मिती करीत असतो. त्यात त्याचा वैयक्तिक आनंद सामावलेला असतो. एखादा कवी "जनसुखाय काव्यनिर्मिती करतो परंतु त्यातही त्याचा कुठेतरी "निजीस्वार्थ" दडलेला असतो. सामान्य कवी व ज्ञानेश यांच्यात हाच तर मूलभुत फरक आहे. या दोघांची काव्यसृष्टी, काव्यप्रयोजने भिन्न आहेत. त्यांची अनुभुती, त्यांचे हेतू, आनंदाच्या कल्पना यात लौकिक पारलौकिकाइतके जमिन असमानाचे अंतर आहे. असे असताना ज्ञानेशांना या कविंच्या पंगतीत बसवून अध्यात्मविदयेचे प्रभावी प्रतिपादन करण्यापेक्षा रसप्रकर्ष व विविध काव्यसौंदर्य निर्माण करण्याची लालसाच त्यांच्या मनात प्रबळ होती असे म्हणणे म्हणजे "वडाची साल पिंपळाला चिकटवणेच नव्हे काय ?

ज्ञानेशांचा जगाविषयीचा अनुभव परिपूर्ण आहे. "पूर्णात पूर्णम उदच्यते" ही त्यांची अनुभुती "समग्र ही दिप्ती घेता । जेवी दिपुचि ये हाता । तेवी नियेचिया तत्वता । शिवुच लाभे ।।" ही पूर्णानुभुती त्यांनी अनुभवलेली आहे. त्यामुळे साहजिकच सामान्य माणसापेक्षा त्यांचा अनुभव वेगळ्या पातळीवरचा ठरतो. सामान्य माणूस रज्जुलाच सर्प मानुन रज्जुच्या अस्तित्वाची दखल न

घेणारा, या मायावी जगालाच सत्य मानुन बसणारा त्यामुळे या भींतीच्या पलिकडेही काही विश्व आहे याची कल्पना नसणारा कुपमंडूक वृत्तीचा . त्यामुळे त्याचा अनुभवही तितकाच मर्यादित. हा मुलभुत फरक लक्षात घेतल्यावर आपोआपच ज्ञानेशांची व सामान्य कवींची दृष्टी कशी विभिन्न आहे हे समजते.

सामान्य कवी कितीही अनुभवी असला तरी त्याचा अनुभव अल्पच. त्यात "आणखि पाहिजेची" भुणभुण कायमचीच. पूर्ण संतुष्टता, स्थायी समाधान, त्याला ठाऊकच नसते. आयुष्याच्या ससेहोलपटीतच तो आनंद मानणारा "न अल्पे सुखम् अस्ति" याची त्यांना जाणीव नसते पण ज्ञानेश्वरादिकांचा अनुभव "सोनियाचा दिवस अमृतात वोळेल असा. मग आनंदी आनंद अवघा आनंदी आनंद. या आनंदात बदल नाही. कि घट नाही. आपल्या भावमृद्मनाने येणारा जगाचा अनुभव भावरम्य शब्दात व्यक्त करणारा तो कवी व त्याची वाङ्मयाभिरूची म्हणजे काव्य. ती काव्याची परिभाषा मानली तर अंशिक जगाचा अर्धवट मनाने अपुरा अनुभव घेऊन काव्य लिहणा-या सामान्य कवींना कवी म्हणण्यापेक्षा समस्त जगाचा पूर्ण अनुभव घेतलेल्या ज्ञानेशांनाच कवी म्हणावे लागेल. केवळ ललित निर्मिती म्हणजे काव्य ठरत नाही. इतर कवी आपला अनुभव आपल्याला रूचले, पचले, झेपेल अशा त-हेने काल्पनिकतेचे रंग देऊन लालित्यपूर्ण भाषेत मांडीत असतात. त्यांच्या काव्यात कल्पना चमत्कृतीला, रंजकतेला अधिक वाव असतो. याउलट ज्ञानेशांचे. त्यांचा अनुभव पूर्ण वास्तव असून तितक्याच समर्थ शब्दात मांडलेला आहे. त्यात काव्य असले तरी रंजकता नाही. लालित्य असते तरी कल्पकता नाही. अध्यात्म असते तरी अवास्तव नाही.

ज्ञानेशांची सहानुभुतीही वेगळी आहे. अंतर्बाह्य जेव्हा त्या परमात्म्याचा विलास अनुभवाला येऊ लागतो अशा अद्वैत क्षणी जो रस अनुभवास येतो तो ब्रम्हरस ज्ञानेश आपल्या काव्यात शब्दबध्द करतात. "जेथ समाधी पावे समाधान ती ही रसवल्ली वेल्हाळ" अशा निर्विकल्प समाधीतच ही रसवल्ली

उगवते. या लोकातीत रसानुभुतीचे उद्गान ज्ञानेश आपल्या अलौकिक आनंद छंदातून करतात. ज्ञानेशांचा हा ब्रम्हरस आस्वादकास शाश्वत शांतीचे, चिरसमाधानाचे अधिकारी बनवतो. इतर कवीचे तसे नसते. त्यांना शृंगारादी नऊ रस महत्वाचे वाटतात. त्यांच्या काव्यातले रसपरिपोष केवळ करमणुकी-खातर असतात. या कवींच्या काव्यातील रसरसानुशीलनाने जो आनंद मिळतो तो तात्कालिक असतो.

शंकराचार्यांच्या मते कवी म्हणजे "क्रांतदर्शी सर्वज्ञ" हा निकष लावावयाचा झाला तर भूतभविष्य वर्तमानादी कालखंड ज्यात खंड पाडू शकत नाहीत अशी अखंड रसानुभुती ज्यांना होत आहे, सम्यक दर्शनालाभाने ज्यांना विश्वातील सर्व वस्तूंचे रहस्य कळलेले आहे ते ज्ञानेश्वरच खरे कवी ठरतात.

कलावंत म्हटला की भावना प्रधान, भावविवश असणारच. त्याच्या जीवनात आलेल्या प्रत्येक भल्याबु-या अनुभवांचे, सुखदु:खाच्या हिंदोळ्याचे प्रतिबिंब त्याच्या कलाकृतीत कुठे ना कुठे येणे अपरिहार्य असते. ज्यांची अनुभुती त्यांच्या स्वत:च्या व्यक्तिमत्वावर, चारित्र्यावर, शिवाचा स्थायी ठसा उमटवु शकत नाही ती त्यांच्या कलाकृतीतुन व्यक्त झाल्यानंतर वाचकांच्या जीवनात शिवत्व कसे स्थापू शकेल ? ज्ञानेशांचे शिवत्व असे अशाश्वत नाही. "शुचित्व गा ऐसे, अंगमन जैसे कापूराचे" तसे त्यांचे मन अंतर्बाहय शुध्द, शिवयुक्त, त्यात भोक्ता भोग्याचा अध्यास नाही, अज्ञान नाही, शुभाशुभ संस्कारांची गुलामी नाही. अंतर्बाहय त्या "लिलामयाचा लीलाविलास", या अनुभुतीने त्यांचे स्वत:चे व्यक्तिमत्व शिवत्वाला प्राप्त झाले. त्यांचे हे शिवत्व इतर कलावंता-प्रमाणे बदलते नाही. अचल, अटळ व अढळ आहे. तिथे दिवसरात्रीचा लपंडाव नाही. केवळ स्वयंप्रकाश ! त्यांच्यात भल्या बु-याचा भेद नाही. सम्यक दृष्टीला काहीच अपवित्र, अशिव दिसत नाही. म्हणूनच पावित्र्य अखंड. इतरांच्या बाबतीत हे शिवत्व अधुनमधुन जाणवत असते. ज्ञानेशांच्या व्यक्तित्वावर शिवानुभुतीचा परिणाम होऊन ते भल्याबु-याच्या हिंदोळ्यापासून चिरमुक्त होतात.

"यत् गत्वा न निवर्तन्ते" अशा ठिकाणी ते पोहोचतात. ही शिवानुभुती त्यांच्या काव्यात प्रतिबिंबित झालेली दिसते.

शिवाप्रमाणे सत्य व सुंदराची अनुभुतीही इतर कवींपेक्षा ज्ञानेश्वरा-बाबतीत निराळी ठरते. ज्ञानेशाचे "सत्य" निरपेक्ष, अतिंद्रिय, सर्परज्जुचे सत्य तर साहित्यिकाचे सत्य सापेक्ष, इंद्रियगम्य, लटके सत्य, असुंदरातही सुंदर पाहण्यात कवींना भूषण. याचा अर्थ कवी प्रत्येक गोष्टीत सुंदर व असुंदर असा भेद मानतात. ही झाली सापेक्ष सौंदर्यदृष्टी. याउलट ज्ञानेशांना कुरूपतेत सौंदर्य न दिसता.. सुंदर व असुंदर या दोहोतही दिसतो तो परमेश्वराचा विलास. म्हणून असत्य नाही, मोह नाही, चारित्र्यावर त्याची गलिच्छ प्रतिक्रियाही नाही. सुंदर असुंदर, नर-नारी अशी संकुचित भावनाच नाही. "जो कुछ है सो तु ही है" असा व्यापक दृष्टिकोन, मिथ्या मी-तू या पूर्ण उपहास, सर्वत्र त्या एकाच आत्मदेवाचा प्रत्यय म्हणून शांत व शिव हा त्यांचा मंत्र. ते "सत्यं- शिवं- सुंदरम्"चा विफल घोष करीत नाहीत. तर "आदय वेद-प्रतिपादय" स्वसंवेदय आत्मरूपाचा जयजयकार करतात.

ज्ञानेशांना आपल्या काव्यात ब्रम्हविदयेचा सुकाळ करावयाचा होता. "विदग्ध रसाचा नाही. इतर कवी विदग्ध रसपरिपोष करू इच्छितात. ज्ञानेशांना रसपरिपोषापेक्षा "अध्यात्म ज्ञान परिपोष" अपेक्षित होता.

ज्ञानेश व इतर कवींमधले हे भेदाचे मुलभूत मुद्दे लक्षात घेतले म्हणजे इतर कवी व ज्ञानेश्वर यांच्यातला महत्वाचा फरक लक्षात येईल व ज्ञानेशांना त्यांच्या पंगतीत बसवणे योग्य आहे की नाही हे समजून येईल.

## ज्ञानेशांच्या निसर्गाचे भिन्नत्व -

ज्ञानेशाचे निसर्गप्रेम विख्यात आहे. निसर्ग प्रेमावर आधारित अनेक दृष्टांत व उपमा त्यांनी दिल्या आहेत. केवळ प्रतिभात्मक कल्पनेने महाकवीला

निसर्गवर्णन करता येईल यात वाद नाही, परंतु अभिजात प्रतिभेला अनुभवाची जोड मिळाली तर अशा वर्णनातील नैसर्गिक सौंदर्य अधिक खुलून दिसेल. लहानपणी त्र्यंबकेश्वर परिसरातील त्यांचे वास्तव्य ज्ञानेशांच्या निसर्गप्रेमाला कारणीभूत ठरले असावे. त्र्यंबकेश्वराचा परिसर निसर्गसौंदर्ययुक्त असा आहे. आळंदीचे सिध्देश्वर मंदिर व सिध्द बेटातले वास्तव्य त्यांच्या शांतवृत्तीला पोषक ठरले. जग चिद्विलास आहे, अवघी वस्तुप्रभा आहे या दृष्टीने ज्ञानेश सृष्टीकडे व तिच्या यच्ययावत् व्यापाराकडे पहात असल्याने त्यांना सर्वत्र आनंदच दिसत असे. बाहयसृष्टीत, सृष्टीव्यवहारात, सरिता सागरात, नक्षत्र तारकात वृक्षवल्लीत, पशुपक्षी विहारात भरलेला आत्मानंद त्यांच्या काव्यात पाझरताना दिसतो. अध्यात्मिक सृष्टीहून अधिभौतिक सृष्टी भिन्न नाही. सारा अव्दयानंदाचा खेळ आहे. आत्मारामाचा विलास आहे. या एकतेच्या अनुभवाने त्यांची वाणी ओथंबलेली आहे. सिध्दांतात अध्यात्म व दृष्टांतात प्रपंच, सिध्दांतात अंतरंग व दृष्टांतात बाहयसृष्टीसौंदर्य असा त्यांच्या वाणीचा विलास आहे. दृष्टांत मिषाने ते चराचर सृष्टीचे व्यवहार दाखवितात. बाहय सृष्टीकडे प्रेमाने, रसिकतेने ते पाहतात. मानवी प्राण्यांचे सूक्ष्म व्यवहार स्वानंदाच्या बैठकीवरुन ते न्याहाळतात. अंतराळातले सूर्य, चंद्र, पृथ्वीवरील जीवसृष्टी यांच्याशी तन्मय पावुन आपल्या विचारांचे तत्वांचे प्रतिबिंब त्याच्यात पाहतात. यातुनच त्यांच्या निसर्गप्रतिमा, दृष्टांत सृष्टीची निर्मिती झालेली दिसते.

अन्य कवी निसर्गाकिडे भोग्य वस्तू किंवा सौंदर्यवस्तू या एकाच दृष्टीकोनातून पहात असतात. परंतु ज्ञानेश मात्र या निसर्गाकिडे केवळ भोग्य वस्तू म्हणून पहात नाहीत. त्यात ते परमात्म्याचे स्वरुप शोधतात. त्याची आरास अनुभवतात. एखादया निसर्गदृष्याकडे पाहिल्याबरोबर त्यांना त्याच्यात असलेला पूर्णत्वाचा विलास अनुभवास येतो. सामान्य कवींप्रमाणे ते केवळ बाहय सौंदर्याकडे पाहून समाधान मानीत नाहीत. एखादे सुंदर निसर्गचित्र पाहिल्याबरोबर ज्ञानेशांना त्यात जाणवतो त्या परमात्म्याचाच चिद्विलास I पण एखादा

कवीमनाचा मनुष्य त्याबाबत निराळेच उद्गार काढतो. या दृष्टीने एका समुद्रप्रवासात निळाशार समुद्र व नभातले पूर्ण चंद्रबिंब पाहून स्वामी विवेकानंदानी काढलेले उद्गार उल्लेखनीय आहेत. ते म्हणतात, " If Maya is so beautiful, think of the Reality behind !"

सामान्य कवी व ज्ञानेश्वर यांच्या अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून वापरलेल्या भावनेच्या पैलूमध्ये साम्य असले तरी दोघांचे व्यक्तित्व, जग, मन, अनुभव, प्रयोजन, कारण, हेतू व फल मात्र भिन्न असते. "कवीकुल शिरोमणी कालिदास आपल्या काव्यारंभी जगाच्या आदिकारणांना वंदन करतो. [रघुवंश] "वागर्थौ इव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये । जगत: पितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ ।। ज्ञानेश्वरही अमृतानुभवाच्या प्रारंभी त्याच विश्वकारणाना वंदन करतात. "अद्वैतं आत्मत: तत्त्वं दर्शयन्तौ मिथस्तराम् । तौ वन्दे जगताम् आदयौ तयौ: तत्वाभिपत्तये ।।" हे दोघेही त्या आदितत्वाला वंदन करतात. पण एक वंदन करतो अर्थवाही, नादमधुर, शब्द सुचावेत म्हणून, तर दुसरा वंदन करतो त्या वंदन शिवशक्तीतत्वाचे आकलन व्हावे म्हणून. यातून कालिदासाची ऐहिकता जाणवते [ Secular Consciousness ] तर ज्ञानेश्वरांची अलौकिकता [ Spiritual Consciousness ] जाणवते. वर्डस्वर्थ देखिल निसर्गकवीच होता. जीवनातील सर्वोच्च मूल्यलाभाविषयी हा भाव विव्हल निसर्गकवी म्हणतो -

" One impulse from the uernal blood
Can teach you more of man
'Of moral; evil and of Good
Than all the sages can !"

तर ज्ञानेश म्हणतात "जयाचा दिठिया-वसंतु, जव व रिगे निज भवना आंतु । तव आपलीये फळी हातु । न घेपतीही ।।" वनश्रीच्या सानिध्यात वसंत ऋतुची केवळ एक झुळुक सुध्दा एक गोर शिरशिरीच कवीला जीवनाचे रहस्य शिकविते. सगळे महापुरुष तिच्यापुढे तुच्छ ठरतात. याउलट जीवनकवी म्हणतात

केवळ एका महापुरुषाचा आश्रय लाभला तरी त्याच्या दयादृष्टीचा वसंत तुमच्या शास्त्राध्ययनवनात शिरताच शास्त्रांचा अर्थ, सम्यकदर्शन तुम्हाला लाभेल. यातून हेच जाणवते की सामान्य निसर्गकवी अनुभूतीशून्य केवळ भावनांचा हास्यास्पद फसफसाट करतात. तर जीवनकवी अनुभूती व्यंजक तेजाळ ज्ञानाचा भावोत्कट अविष्कार करतात. जीवनाची सिध्दी, साध्य व साधनाबद्दल यांच्या विचारात बरीच तफावत दिसते.

ज्ञानेश्वरांच्या काव्यातला हा निसर्ग सामान्य निसर्गकवींच्यापेक्षा कसा वेगळा आहे हे आपण पाहिले. त्यांचा निसर्ग एका अतृप्त माणसाचा नाही तर तृप्त भक्ताचा.... योग्याचा आहे. एका योग्याला आपल्या साध्यसाधनेतून जाणवलेला चैतन्याचा अविष्कार ज्याच्या रुपात प्रतिबिंबीत झालेला दिसला असा हा निसर्ग आहे. येथे सुंदर-कुरुप, सुखद- दु:खद अशा द्वैताचा स्पर्शही नाही. जे आहे ते सर्व त्या परमात्म्याचा विलास एवढीच भावना आहे. म्हणनच त्यांचा निसर्ग अलौकिक पातळीवर जाऊन पोहोचतो. या चराचरात त्यांना त्या विश्वरुपाची असंख्य प्रतिबिंबे दिसतात. त्यात एक अनामिक तृप्तीचा हुंकार जाणवतो. शाश्वत समृध्दी, साफल्य यांचा प्रत्यय येतो.

ज्ञानेशांचा निसर्ग असा अद्‌यानंदानी भारलेला, चिद्‌विलासपूर्ण असा आहे हे पाहिल्यावर एका गोष्टीची स्पष्ट जाणीव होते की त्यांच्यातला निसर्गवेडाने भारलेला हा कवी आपले काव्य फुलवताना संतांच्या मांदियाळीत, ब्रम्हविद्येचा सुकाळ करताना या निसर्गाचा आश्रय घेणार नाही तरच नवल ! आपल्या विवेचन सुलभतेसाठी त्यांनी या निसर्गाचे भरपूर सहकार्य घेतले आहे. निसर्गातील पशुपक्षीप्राणी, वृक्षवल्ली, फुले, फळे, चंद्र, सूर्य या सा-या घटकांचा त्यांनी समुचित वापर केलेला दिसतो. विषयाच्या अनुषंगाने विवेचनाच्या ओघात ते निसर्गातील विविध घटनांचे, वस्तुंचे, घटकांचे दृष्टांत देतात. त्यांचाच सढळ वापर उपमा रुपकातही करतात. इतकेच काय तर आपल्या

तत्वार्थ प्रतिपादनासाठी अधुन मधुन निसर्गप्रतिमांचीही पखरण करतात. नित्य व्यावहारिक जीवनातील प्रतिमांबरोबरच ते निसर्गातील उचित, समर्पक प्रतिमांचाही मुक्त हस्ताने वापर करतात. किंबहुना त्यांच्या या निसर्गप्रतिमा त्यांच्या लेखनाचे महत्वाचे वैशिष्टयपूर्ण अंग बनतात. स्वतंत्र अभ्यासाचा विषय बनतात. त्यातील सुयोग्यता, अर्थघनता, वापरण्याची हातोटी, चपखलपणा, सुलभता या सर्व गोष्टींवर स्वतंत्र अभ्यास करता येण्याजोगा आहे.

ज्ञानेश स्वत: कवी मनाचे होते. एक उत्कृष्ट निसर्गकवी होते व कोणताहि कवी वाच्यार्थाच्या भाषेत बोलत नाही तो नेहमी प्रतिमांच्या भाषेत बोलत असतो. ज्ञानेशही नेहमी प्रतिमांची भाषा वापरतात. रूक्ष, नीरस प्रतिपदाशी झाडा देत तत्वार्थ विवेचन ते करीत नाहीत तर ते उपमा, रुपक, दृष्टांत, प्रतिमा यांच्या भाषेत हरेक ओवी सजवून, फुलवून, रसिकांपुढे ठेवतात. जेणे करुन सामान्य रसिकांनी त्यातील काव्याचा आस्वाद घ्यावा. शास्त्री पंडितांनी त्यातील तत्वज्ञान उचलावे व सश्रध्द भाविकांनी त्यांतील भक्तीचा निखळ आनंद लुटावा. ज्ञानेशांच्यातला तत्वज्ञ त्यांच्यातल्या कवीच्या आड येत नाही. त्यांच्यातला हा रसिककवी तत्वार्थ बोधास बाधा आणीत नाही. ज्ञानेश्वरीतला निसर्ग स्वतंत्ररित्या अभ्यासू जाता त्यातील प्रत्येक निसर्गप्रतिमा म्हणजे एकेक मोग-याची टपोरी कळीच आहे. तिचा आस्वाद स्वतंत्ररित्या घ्या वा त्या कलिकांची सुंदर माला गुंफुन तिचा आनंद लुटा. एक आगळा वेगळा दिव्यानुभव यात आपणास जाणवतो. याच निसर्गप्रतिमांचा रसग्रहणात्मक विचार आपण पुढील प्रकरणात करणार आहोत.

## ज्ञानेशांची चौफेर दृष्टी -

ज्ञानेशांनी आपल्या ग्रंथात अध्यात्माचे निरुपण केले असले तरी हे करताना मानवी जीवन त्यांनी किती विविधांगानी निरखून पाहिले होते याची साक्ष त्यांचे शेकडो दृष्टांत देतात. मानवी स्वभाव व त्याच्या विविध

छटा रंगवण्यासाठी ज्ञानेशांनी विविध प्राणी, पशु, पक्षी, किटक, वृक्षवेली, फुले, फळे इ. चा जो उल्लेख केला आहे तो ही आश्चर्यकारक आहे. हे सर्व सृष्टीचे घटक उपमानादीच्या रुपात त्याच्या जीवनदर्शनाचे वैभव वाढवण्यास जणू काही तत्पर असतात. म्हातारपणी शरीरावर सुरकुत्या पडल्या की गुड्या उंदासारखा होतो. इंद्रिय विषयाची सोबत सुखदायी ठरत नाही हे सांगताना उंदरास सर्पफणीची सावली मानवेल काय ? अशी कित्येक उदाहरण देता येतील. पक्षी व कृमी किटकात तर हंसापासून गिधाड घुबडापर्यंत सारे हजेरी लावून जातात. मुंगी, गोचीड, काजवा यांचेही त्यांना वावडे नाही. त्याच्या प्रतिभेच्या दृष्टितून वृक्ष, वेली, पाने, फुले इ. सुध्दा सुटलेली नाहीत. या हरित सृष्टीवर तर त्यांचा विशेष लोभ दिसतो.

औषधी वृक्षापासून सुगंधी तरुपर्यंत, छोटया रानकळीपासून उमलीत कमलपुष्पापर्यंत, चिमण्या लतिकेपासून वडादि वृक्षापर्यंत सारे सारे त्यांच्या प्रतिमासृष्टीत समाविष्ट होतात. चंद्र, सूर्य, चांदणे, षड्ऋतुचे सोहळे ज्ञानेश अनुभवायला देतात. येथे विचार करण्याजोगी एक प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे ज्ञानेश निसर्गाचीच उदाहरणे का घेतात." याचे उत्तर स्पष्ट आहे की आजच्या शतकाच्या तुलनेने पाहता बाराव्या, तेराव्या शतकात निसर्ग माणसाच्या अधिक भवतीभवती होता. मानव हा मूलत: एक निसर्गाचाच घटक होय. तो निसर्गाशी एकरुप असतो. त्याचे अस्तित्वच निसर्गसिध्द असते. या गोष्टीचे अवधान ठेवूनच ज्ञानेशांनी तेज, रंग, रस, गंध, स्पर्श, नाद याची अनेक उत्तमोत्तम उदाहरणे दिली आहेत. निसर्गाइतके भव्यदिव्य काही नाही. म्हणूनच निसर्गातल्या भव्यदिव्य वस्तूंची उदाहरणे ते देतात. आकाश, सूर्य, चंद्र यांची जवळजवळ शंभराधिक उदाहरणे ते देतात. सारी उदाहरणे अत्यंत चपखल व समर्पक अशी आहेत.

निसर्गातल्या विविध रंगछटांचे त्यांना आकर्षण होते. हे विविधरंगी छटांचे सौंदर्य आपण प्रकाशामुळे आत्मसात करु शकतो. निसर्गातील सर्व प्रकारचा प्रकाश, सर्व प्रकारचे तेज यांची मोहिनी कोणास पडणार नाही ? म्हणूनच या

तेजाच्या वा प्रकाशाच्या अनेक उपमा, दृष्टांत ज्ञानेश्वरीत आहेत. सूर्य म्हणजे तेज, अंधार केवळ रात्रीचाच नसतो तर अज्ञानाचाही असतो. तेजाचा एक विशेष आहे तो म्हणजे तेज अंधाराचा विनाश करतेच पण त्यापेक्षा त्या अंधकारस्थितीला आपल्यासम तेजोमय करून सोडते. या तेजोनिधी सूर्याचे महत्त्व लक्षात घेऊनच ज्ञानेश आपल्या उपमाप्रतिमांमध्ये त्याचा उपयोग करतात. निसर्गातल्या परिचित गोष्टींना सचेतन रुप देऊन त्यांच्याद्वारे सूक्ष्म मानवी भावनांचा परिणामकारक अविष्कार ज्ञानदेवांनी घडवला आहे. अविवेकाची काजळी, शांतीचा अंकुर, उन्मेख चांदणे, तपोदुर्गाचा आडकडा, आनंदसरोवराचो कमळे, काजव्याचो लुकलुक, दीपकळीकेचे कोमल तेज, नक्षत्रतारकांचे लावण्य, चंद्राची शीतल प्रभा, माधुर्याचे कोंब अशी अनेक उदाहरणे देता येतील.

निसर्गातल्या विविध मनोहारी दृष्यांचे, विविध रंगांगाचे मानवाला आकर्षण वाटत आले आहे. हे अनुपम रंगविलास मानवाला नित्यचिंताही विसरायला लावतात. मानवी मनास रिझवणा-या या निसर्गरंगाच्या अनिवार आसक्तीचे दर्शन ज्ञानेश्वरीत दिसून येते. निसर्गाने केलेली ही रंगांची उधळण ज्ञानेशही अत्यंत चातुर्याने व मोहकतेने चित्रित करतात. एखादया कुशल चित्रकाराने आपल्या सुप्रतिभ कुंचल्यातुन रंगाचे विलक्षण अविष्कार घडवावे. तसेच विराट रंगदर्शन ज्ञानेश्वरही घडवतात. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच्या सूर्यप्रकाशाच्या विविध रंगछटांबरोबरच त्या तेजातून स्त्रवणा-या शुभ्रधवल रंगाचे वर्णनही निसर्गातल्या विविध घटनांशी सांगड घालून ते करतात. एकच शुभ्ररंग, मोत्यांची शुभ्रता, चांदीचा मुलामा, चंदन उटीची शुभ्रता, चाफ्याचा शुभ्रवर्ण, कापूर, स्फटिक, पारा, दूध, बर्फ, चंद्रप्रकाश, लखलखती वीज इतक्या विविध रुपात त्यांना भावतो. अशा कित्येक रंगाचे तसे गंधांचेही उल्लेख ते करतात. कमळ, चाफा, शेवंती, सोनचाफा, मोगरा, जाईजुई, तुळशीही त्यांच्या प्रतिभाकक्षेत येतात. स्पर्श व नादाचेही त्यांना वावडे नाही. स्पर्श हा वा-याचा गुण आहे हे मोठ्या मार्मिकपणे ते सांगतात. "पवनु अति निश्चळु । मंद झुळके ।" [ज्ञा.अ. ६-१७५] वसंतातील सुगंधी मंद शीळ, थंड वा-याची झुळुक याप्रमाणे

कोकिलरव, सागराचे तांडवध्वनी, मेघगर्जना, नदीचा खळाळ हे ध्वनीही शब्दबध्द करतात.

या सा-या निसर्गोपमा प्रतिमा पाहता एक म्हणावेसे वाटते की, "ज्ञानेशांनी शांत रसाच्या खालोखाल आणखी एक रस नव्याने आणला तो म्हणजे निसर्गरस". ज्ञानेश्वरीतला हा निसर्गरस अभ्यासकांच्या पुढक एक आव्हानच आहे. या "निसर्गरसा"ची विविध रुपे अभ्यासकांकडून अद्याप दुर्लक्षित राहिली आहेत. या संपूर्ण निसर्गाचा अभ्यास बराच व्यापक विषय ठरेल म्हणूनच या अभ्यासाचे एक उपांग म्हणून "निसर्गप्रतिमांचा" अभ्यास आपण करणार आहोत.

## समारोप -

प्रस्तुत प्रकरणात आपण ज्ञानेशाचे व्यक्तित्त्व, त्यांची ग्रंथसंपदा, त्यांच्यावरील पूर्वसंस्कार, त्यांच्यातला कवी व तत्वज्ञ, त्यांचा समन्वयवादी दृष्टिकोन, ज्ञानेश व इतर कवींच्या मधला फरक, ज्ञानेशांच्या निसर्गाचे भिन्नत्व या सर्व मुद्यांचा विचार केला.

या सर्व उहापोहातुन आपण काही निष्कर्षाप्रत पोहोचलो. काही मताचे खंडन केले तर काही मतांचा समन्वयवादी दृष्टिकोनातुन स्वीकार केला. ज्ञानेशांच्या निसर्ग प्रेमाबद्दलही परिचयात्मक पातळीवर थोडाबहुत विचार केला. किंबहुना तिसरे प्रकरण चौथ्या प्रकरणाचा पूर्वरंग ठरावे या भुमिकेतून मांडले. या प्रकरणातुन पुढील प्रकरणाशी संबंधित असणा-या काही गोष्टी आपण निर्देशित केल्या.

निष्कर्ष -

१] ज्ञानेशांसारखा अभुतपूर्व व्यक्तित्त्व असणा-या एका सिध्दप्रज्ञ योग्याने जनकल्याणाची आस ठेवून एका उदात्त हेतूने आपल्या ग्रंथचतुष्टयाची निर्मिती केली.

२] सामान्य जनांना मनाचा मारा न करता "श्रवणामाजी मोक्ष" मिळावा, अतिंद्रियाचा मुक्तीत्सव या इंद्रियांनी भोगता यावा ते अरुपाचे रूप "याचि देही याची डोळा" अनुभवास मिळावे ही त्यांची प्रमुख मनीषा होती.

३] तत्वप्रतिपादकाप्रमाणे रसिक कवीची भुमिकाही त्यांनी स्वीकारली होती.

४] पूर्वसूरींच्या, वेदोपनिषदांच्या प्रगाढ अध्ययनातून त्यांची वाणी सुसंस्कारीत झालेली होती.

५] बहुतांशी अभ्यासक ज्ञानेशांच्या व्यक्तित्वाकडे पाहतांना एकांगी दृष्टिकोनातून पाहतात व त्यांना तत्वज्ञ किंवा कवी ठरवतात. परंतु असे न पाहता त्यांच्याकडे "तत्वज्ञ कवी" अशा समन्वयवादी दृष्टिकोनातून पाहणेच योग्य ठरते.

६] इतर कवी व ज्ञानेश यांच्या निसर्गाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बरेच तफावत दिसते.

७] ज्ञानेशांनी आपले साहित्य सजवताना निसर्गाची सढळ हातानी मदत घेतलेली दिसते. आपल्या उपमा, दृष्टांत एवढेच नव्हे तर आपली सारी प्रतिमासृष्टी या निसर्गातल्या विविध घटकांच्या आधारे सजवलेली दिसते. याच निसर्गप्रतिमांचा रसग्रहणात्मक अभ्यास आपण पुढील प्रकरणात करणार आहोत.

"रसग्रहणात्मक" असे म्हणण्याचा उद्देश हा की या निसर्गप्रतिमांमधले भावसौंदर्य, संवेदनशीलता, प्रभाव, परिणामकारकता या सर्व गोष्टींवर आपण विशेष भर दयावयाचा आहे. एखादया प्रगाढ ज्ञानी वैय्याकरण्यासारखे हरेक प्रतिमेचे विश्लेषण न करता, त्यांच्यातल्या दोषांचेच दिग्दर्शन न करता आपण त्यातील भाषिक, आशय व भावसौंदर्याचा आस्वाद घ्यावयाचा आहे हे लक्षात ठेवून पुढील प्रकरणाकडे वळावे लागेल.

:

## संदर्भ ग्रंथ


१. भोसले द. ता. -"ज्ञानेश्वरी अध्याय १" - प्रस्तावना.

२. दादेगावकर पद्माकर रा. "ज्ञानेश्वरांची रससमिक्षा" - हैद्राबाद विद्यापीठ.

३. दांडेकर शं. वा. -"ज्ञानेश्वरी अध्याय बारा"-व्हीनस प्रकाशन, पुणे. पुनर्मुद्रण १९८९.

४. एरंडे अशोक [संपा. ]- "ज्ञानेश्वर सप्तशताब्दिग्रंथ" ज्ञानेश्वर विद्यालय, ने... प्रथमावृत्ती १९९१.

५. गुणे मो. रा. - "ज्ञानेश्वरीचे भावविश्व".

६. जोग रा. श्री. - "मराठी वाङ्मयाभिरूचीचें विहंगमावलोकन". पुणे विद्यापीठ प्रकाशन प्रथमावृत्ती १९५९, पुष्प ५ वे केरकर स्मारक व्याख्यानमाला.

७. जोशी प्र. ल. - "मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास", प्रसाद प्रकाशन, पुणे, द्वि. आ. १९७८.

८. जोशी प्र. न. - "ज्ञानेश्वरांचे जीवनदर्शन" - प्रसाद प्रकाश, पुणे. प्रथमावृत्ती १९७२.

९. लेले वा. के. - "ज्ञानेश्वरीचा शास्त्रीय अभ्यास"- साहित्यप्रसार केंद्र, नागपूर. व. आ. १९८३.

१०. पांगारकर ल. रा. -"कराठी वाङ्मयाचा इतिहास" खंड पहिला -विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे. द्वि. आ. १९७२.

११. शेणोलीकर ह. श्री. - "मराठी संतवाणीचे मंत्राक्षरत्व" मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. प्र. आ. १९९०.

१२. शेटे वि. त्र्यं. - "संतज्ञानदेव चरित्र, कार्य व तत्त्वज्ञान" - श्री ज्ञानेश्वर विद्यापीठ प्रकाशन, आळंदी. प्र. आ. १९७६.

१३. स्वामी शिवतत्वानंद - "श्री ज्ञानेश्वर - तत्वदर्शी आणि कवी" - रामकृष्ण मठ, नागपूर, च. आ. १९८६.

१४. तावरे स्नेहल - "ज्ञानेश्वरीतील सृष्टी" - लेख -"ज्ञानेश्वरी आणि निसर्ग"

१५. तुळपुळे शं. गो. - "पाच संतकवी" - सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे. तृ. आ. १९८४.

१६. ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी निमित्त्य पाच लेख - "केसरी" ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी विशेषांक जून १९९०.